संपूर्ण माणदेशात एकाचवेळी प्रसिध्द होणारे एकमेव दैनिक

mandeshexpressatp@gmail.com

दैनिक

माणदेशी बुलंद आवाज..

# माणदेश एक्सप्रेस

संपादक : दिपक गौतम प्रक्षाळे

मोबा. ९५९५०४७६७६/९५०३६३८६८६

www.mandeshexpress.com

एम एन जाधव (सर) हॉस्पिटल यांचे



श्राव्या डायग्नोस्टिक्स

डिजिटल एक्स-रे सोनोग्राफी सेंटर,आटपाडी

डॉ.सौ. चैताली समेश जाधव (M.B.B.S. D.M.R.E.)

डॉ. समेश मधुकर जाधव (M.B.B.S.M.S. D.N.B. F.M.S.)

उपलब्ध सुविधा

* सर्व प्रकारचे डिजिटल एक्स-रे * गरोदर मातांची सोनोग्राफी 4 D स्कॅन व गर्भातील बाळांचे व्यंग निदान करणे * पोटाची, छातीची, थायराईड व स्तनाची अत्याधुनिक (हाय रिझोल्यूशन) स्कॅन * वंधत्वसाठीची आणि पाळीच्या समस्या बाबतच्या सोनोग्राफी * इंटरव्हेशनल सोनोग्राफी * सोनोग्राफीद्वारे गाठीचा तुकडा तपासणे, छातीतील किंवा पोटातील पाणी. पु काढणे. तसेच लिव्हर मधील गाठीचा (Abcess) सोनोग्राफीद्वारे उपचार

पत्ता : ग्रामीण रुग्णालयासमोर, आटपाडी

वर्ष : ६ वे ● ● अंक : १०७ ● ● सोमवार दि. ०४ मार्च २०२४ ● ● किंमत २ रु ● पाने : ४ ● RNI : MAHMAR/2017/77021

# ४०० जागा कसे जिंकतात तेच पाहतो

# उद्धव ठाकरे भाजपाविरोधात आक्रमक

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

मुंबई :आगामी लोकसभा निवडणुकीची कोणत्याही क्षणी घोषणा होऊ शकते. ही निवडणूक लक्षात घेता महाराष्ट्रातील राजकीय घडामोडींना वेग आलाय. सत्ताधारी आणि विरोधक एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करतायत. उद्धव ठाकरे यांनीदेखील एका जाहीर सभेला संबोधित करताना भाजपावर सडकून टीका केली. भाजपा आणि आमचं हिंदुत्त्व वेगळं आहे. भाजपा ४०० जागा कशी जिंकते तेच मी पाहतो, असं उद्धव ठाकरे म्हणाले.

याआधीच्या लोकसभा निवडणुकीत भाजपा आणि शिवसेनेच्या युतीने ४२ खासदार निवडून दिले नसते, तर भाजपाला दिल्लीचं तख्त राखता आलं नसतं. आता दिल्लीचं तख्त पहिल्यांदा फोडावं लागेल आणि तिथे आपलं तख्त बसवावं लागेल. अबकी बार ते ४०० पार असं सांगतायत. मी तर म्हणतो की अबकी बार भाजपा तडीपार करुया. तुम्ही ४०० पेक्षा अधिक जागा कसे जिंकतात तेच मी पाहतो, असं आव्हान उद्धव ठाकरेंनी भाजपाला दिलं.

भाजपाने आमचा विश्वासघात केला, असा आरोपही उद्धव ठाकरेंनी भाजपावर केला. अरे गेल्या वेळेला महाराष्ट्राने ४० ते ४२ खासदार निवडून दिले नसते तर भाजपाला २५० पेक्षा अधिक जागा जिंकता आल्या नसत्या. भाजपाने दोन वेळा आमचा विश्वासघात केला, असं ठाकरे म्हणाले.

आम्हाला भाजपाचं हिंदुत्त्व मान्य नाही. आमचं हिंदुत्त्व वेगळं आहे, असंही उद्धव ठाकरेंनी स्पष्टपणे सांगितलं. आम्ही हिंदुत्त्वाच्या मुद्द्यावर भाजपासोबत होतो. मात्र भाजपाचं आणि आमचं हिंदुत्त्व खूप वेगळं आहे. मला भाजपाचं हिंदुत्त्व मान्य नाही. आज



समाजवादी विचारांचे सगळे लोक माझ्यासोबत आले आहेत. मुस्लीम लोकही आज माझ्यासोबत आहेत. कारण आमचं हिंदुत्त्व हे घरातली चूल पेटवणारं आहे. भाजपाचं हिंदुत्त्व हे घर पटेवणारं आहे. आमचं हिंदुत्त्व हे संत गाडगेबाबा यांचं हिंदुत्त्व आहे. जो तहाणलेला असेल त्याला पाणी देणं, जो भुकेला असेल त्याला अन्न देणं, ज्याला घर नाही त्याला घर देणं हे आमचं हिंदुत्त्व आहे, असं ठाकरेंनी स्पष्टपणे सांगितलं.

## ...तर असंतोषाचा भडका उडेल

आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्य तसेच देशातील राजकीय घडामोडींना वेग आलाय. सत्ताधारी आणि विरोधक एकमेकांवर टोकाचे आरोप-प्रत्यारोप करतायत. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आज (३ मार्च) एका सभेला संबोधित केलं. यावेळी त्यांनी देशासह राज्यात सत्ताधारी भाजपाविरोधात असंतोष आहे. भाजपाने यावेळी ईव्हीएममध्ये घोटाळा करून दाखवावाच. तसं केलं तर देशात असंतोषाची लाट येईल. देशातील हुकूमशाहीविरोधात आम्ही एकत्र आलो आहोत, असं ठाकरे म्हणाले. यावेळी बोलताना त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावरही टीका केली.

## तुम्ही ईव्हीएम घोटाळा करूनच बघा

आज शेतकरी, कामगार, विद्यार्थी आक्रोश करत आहेत. पण ईव्हीएममध्ये काय होणार? अशी भीती सर्वांनाच आहे. लोकांमध्ये सरकारविरोधात उघड रोष दिसतो. या वेळेला त्यांनी ईव्हीएममध्ये घोटाळा करण्याचा प्रयत्न केला तर असंतोषाचा भडका उडाल्याशिवाय राहणार नाही. तुम्ही ईव्हीएम घोटाळा करूनच बघा, असं आव्हान ठाकरेंनी भाजपाला दिलं.

# मुलांनी मोबाईल ऐवजी मैदान जवळ करावे : डॉ. सुरेश खाडे

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

सांगली : हल्ली मुले मोबाईलमध्ये खूप गुंतली आहेत. या मोबाईल ऐवजी मुलांनी मैदान जवळ केल्यास त्यांच्या आरोग्यासाठी ते अधिक चांगले होईल, असे प्रतिपादन पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे यांनी केले. निमित्त होते विश्रामबाग येथील महासंस्कृती महोत्सवातर्गंत, 'यलो सांगली हॅपी स्ट्रीट' या कार्यक्रमाचे....

जीवनातील टेन्शन, चिंता, काळजी या सारख्या शब्दाला पूर्ण विराम देण्याच्या उद्देशाने या हॅपी स्ट्रीट कार्यक्रमाचे आयोजन जिल्हा प्रशासनाच्यावतीने करण्यात आले होते. या उपक्रमाला पालकमंत्र्यांनी अचानक भेट दिली. तेथील संपूर्ण वातावरण पाहिल्यानंतर पालकमंत्रीही क्षणभरासाठी आपल्या बालपणीच्या कालखंडात रंगून गेले. उपस्थित स्थानिक कलावंताशी त्यांनी अतिशय आत्मियतेने संवाद साधला. तसेच ' नंदीबैल - मालकास 'छोटीशी बक्षिसीही अदा केली.

सकाळी ८ ते ११ या वेळेत पार पडलेल्या या हॅपी स्ट्रीट उपक्रमामध्ये बालकांबरोबर-पालक ही आपले वय विसरून सहभागी झाले होते. या हॅपी स्ट्रीट उपक्रमात बालपणीच्या सर्व आठवणींना पुन्हा एकदा उजाळा देण्याचे काम जिल्हा प्रशासनाने केले. बाळ गोपाळांना आनंद देणारा मिकी माऊस, काचेच्या गोट्या, लघोर, घोडेस्वारी, योगासने, लेझीम, झांज, युद्ध कलेची प्रात्यक्षिके, झुंबा डान्स, गायन, मिमिक्री त्याचबरोबर उपस्थित नागरिकांनी उत्स्फूर्तपणे कोणताही कलाप्रकार सादर करावा याची मुभा सादरकर्त्यांना यावेळी देण्यात आली होती. त्यालाही नागरिकांनी गायन व नृत्याच्या रूपाने प्रतिसाद दिला.

याप्रसंगी बैलगाडी, घोडेस्वारीची सफर मुलांनी अनुभवली तर नंदी बैलाची मोठी शिंगे बघून बाल चमू अचंबित झाला. स्वतःचे वय विसरायला लावणाऱ्या या जिल्हा प्रशासनाच्या उपक्रमाबाबत उपस्थितांच्या चेहऱ्यावर 'आनंदरेषा' न उमटल्या तर नवलच . . ! शेवटी उपस्थितांचे आभार निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती पाटील यांनी मानले.

# कर्मचाऱ्याच्या वारसांना ग्रॅज्युईटी धनादेश वाटप

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

कडेगाव : कडेपूर ता. कडेगांव येथील संपतराव देशमुख को. ऑप. मिल्क युनियन लिमिटेड कडेपूर (डोंगराई दूध) संघाचे मेंटेनन्स सुपरवायझर प्रवीण महादेव तोडकर यांचे सप्टेंबर महिन्यात अल्पशा आजाराने निधन झाले होते. त्यांच्या पश्चात त्यांची पत्नी वैशाली तोडकर व मुलगी यांना ग्रॅज्युईटी रक्कम १,५६,९२४ रुपयांचा धनादेश संघाचे संस्थापक अध्यक्ष सांगली जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष संग्रामसिंह देशमुख यांच्या हस्ते सुपूर्द करण्यात आला.

यावेळी बोलताना संग्राम देशमुख म्हणाले की, वेळ कधी कोणाला सांगून येतं नसते त्यामूळे हि रक्कम मुलीच्या शिक्षणासाठी व भविष्यासाठी वापर करा. पैशाचे चांगल्या प्रकारे नियोजन करावे, तसेच यापुढे कोणत्याही प्रकारची अडचण आलेस हक्काने आम्हाला सांगावे, तुमची अडचण निश्चित च सोडवली जाईल. यावेळी देशमुख यांनी मृत कर्मचाऱ्याच्या कुटुंबीयांचे सांत्वन केले.

यावेळी दूध संघाचे चेअरमन राजकुमार निकम, व्हा. चेअरमन. चंद्रकांत पाटील, संचालिका मंदाताई करांडे, कार्यकारी संचालक प्रकाश मानकर, डेअरी मॅनेजर विशाल जाधव, लेबर ऑफिसर कैलास तोडकर, आण्णा तोडकर, संभाजी चव्हाण अजित यादव उपस्थित होते.



डोंगराई दूध संघ कडेपूर येथे मृत कर्मचाऱ्यांच्या वारसांना ग्रॅज्युईटी धनादेश देताना संग्रामसिंह देशमुख सोबत चेअरमन राजकुमार निकम, व्हा. चेअरमन. चंद्रकात पाटील, मंदाताई करांडे आदी.

# गोमेवाडी येथे एकास मारहाण

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

आटपाडी/प्रतिनिधी : आटपाडी तालुक्यातील गोमेवाडी येथे एकास कुकरची वायर तसेच प्लास्टिकच्या पाईप मारहाण करण्यात आली. याबाबत फिर्यादीच्या फिर्यादीनुसार आटपाडी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी, गोमेवाडी येथे दत्तात्रय बबन काळे (वय ५५) हे राहण्यास आहेत. यातील आरोपी अभिजित दतात्रय काळे व अमित दतात्रय काळे यांनी फिर्यादीस घराची कडी बंद करण्याच्या कारणावरून वाद होवून फिर्यादीला कुकरची वायर तसेच प्लास्टिकच्या पाईप तसेच लाथाबुक्यांनी मारहाण करून शिवीगाळी केली. फिर्यादीच्या फिर्यादीनुसार आटपाडी पोलिसात सदरचा गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर घटनेचा पोलीस अधिक तपास करत आहेत.

# पानी फाउंडेशन फार्मर कप स्पर्धेत शेरेवाडी, खरसुंडी येथील महिला बचत गट विजयी

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

आटपाडी/प्रतिनिधी : पानी फाऊंडेशन प्रस्तुत फार्मर कप २०२३ स्पर्धेत आटपाडी तालुक्यातील महिलांची बाजी स्पर्धेत मिळवलेल्या तालुका व राज्यस्तरीय यशामुळे गट शेती चळवळ वाढीस मोठी मदत होणार आहे. आटपाडीच्या शेरेवाडी आणि खरसुंडी येथील महिला शेतकरी गटांनी ऐतिहासिक विजय मिळवला.





आटपाडी : पानी फाऊंडेशन प्रस्तुत फार्मर कप २०२३ स्पर्धेत आटपाडी तालुक्यातील खरसुंडी व शेरेवाडी येथील गटांना बक्षीस वितरण करताना अभिनेते अमीर खान, किरण राव व उपस्थित मान्यवर

महाराष्ट्रातुन तब्बल ३००० महिला व पुरुष शेतकरी गट या स्पर्धेत सहभागी झाले होते. यामध्ये महाराष्ट्र राज्यात शेरेवाडीच्या प्रगती महिला शेतकरी गटाने तिसऱ्या क्रमांकाचे रोख रक्कम अडीच लाख आणि स्मृतिचिन्ह असे बक्षीस मिळवुन ऐतिहासिक विजय प्राप्त केला. तसेच खरसुंडीच्या हरित क्रांती महिला शेतकरी गटाने आटपाडी तालुक्यात प्रथम क्रमांक मिळवत रोख रक्कम एक लाख रुपये आणि मानचिन्ह मिळवले, आणि आटपाडीचा झेंडा काल अवघ्या महाराष्ट्रात फडकवला.

शेतकऱ्यांनी एकत्र येऊन गट शेती करावी आणि आपले उत्पन्न वाढवून कमी खर्चात शास्त्रज्ञ मार्गदर्शनातून विषमुक्त शेतमाल उत्पादित करून प्रतवारी, पॅकिंग, प्रक्रिया करून शेतमालाला योग्य भाव मिळावा यासाठी पानी फाऊंडेशन गेल्या ३ वर्षांपासून अविरत काम करत आहे.

तालुका अभियान कक्ष व्यवस्थापक क्लस्टर कॉरडीनेटर पंचायत समिती गटविकास अधिकारी मुक्तेश्वर माडगूळकर, सहाय्यक गटविकास अधिकारी सचिन भोसले, तालुका कृषी अधिकारी मारुती कौलगे यांनी या सामाजिक चळवळीस वाढवण्यास हातभार लावण्याचे महत्वपूर्ण काम केले.

अभिनेते अमीर खान, किरण राव यांचे हस्ते पुरस्कार वितरण झाले. सीईओ सत्याजित भटकळ, प्रमुख मार्गदर्शक डॉ. अविनाश पोळ, रीना दत्ता, ल्यानसी फर्नांडिस, सह्याद्रीचे विलास शिंदे, कृषी अधिकारी डी.एल. मोहिते, साहिल भट्टड, जितेंद्र आणि स्पृहा जोशी, सांगली पाणी टीम इतर मान्यवर उपस्थित होते.

११ मार्च पासून ४ बॅचमध्ये सर्व प्रगतीशील व शेतकरी तसेच युवा यांना अडीच दिवसीय संजीवनी कृषी पर्यटन केंद्र येथे प्रवास भोजन यासह निवासी मोफत प्रशिक्षण घेता येणार आहे. यासाठी ज्यांना यामध्ये सहभाग करून घ्यायचे आहे त्यांनी तालुका समन्वयक सुहास पाटील व राजेंद्र पाटील यांना संपर्क करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# महासंस्कृती महोत्सवात गर्जा महाराष्ट्र कार्यक्रमाला रसिकांचा उदंड प्रतिसाद

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

सांगली : महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक कार्य विभाग व सांस्कृतिक कार्य संचालनालय मुंबई व सांगली जिल्हा प्रशासन यांच्या वतीने कल्पद्रुम मैदान नेमिनाथनगर सांगली येथे आयोजित करण्यात आलेल्या महासंस्कृती महोत्सवातील आज प्रथम दिनाच्या दुसऱ्या सत्रात रसिक प्रेक्षकांसाठी गर्जा महाराष्ट्र हा सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आला.



सांगली : येथे महासंस्कृती महोत्सवातील आपली कला सादर करताना कलाकार

विशेषत: गर्जा महाराष्ट्र या कार्यक्रमात जय गुरूकूल संस्थेच्या विद्यार्थ्यांनी जो शिवकालीन मर्दानी खेळ केला त्याला उपस्थित प्रेक्षकांनी टाळ्यांच्या गजरात प्रतिसाद दिला. यावेळी धनश्री आपटे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी भरतनाट्यम नृत्य सादर केले. तसेच यावेळी गज नृत्य त्याचबरोबर मल्लखांब आदी देशी खेळांचे प्रात्यक्षिक सादर झाले. यावेळी महिला महाराष्ट्र केसरी प्रतिक्षा बागडी यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

प्रारंभी ज्ञानेश्वर मिश्रा यांच्या सुरेल आवाजात अभंग रचना सादर करण्यात आली. यावेळी अतिशय भक्तीमय वातावरण झाले होते. या संपूर्ण कार्यक्रमाचे निवेदन अभिनेत्री पूर्वी भावे यांनी आपल्या सुरेल आवाजात सहअभिनय केले. कार्यक्रमाच्या शेवटी अभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांनी लावणी नृत्य सादर केले. कल्पद्रुम मैदानावर पार पडलेल्या या कार्यक्रमासाठी हजारो सांगलीकरांनी हजेरी लावली.

उद्या रविवार दि. ३ मार्च रोजी महासंस्कृती महोत्सवात सादर होणारे कार्यक्रम पुढीलप्रमाणे - (१) सकाळी ८ ते ११ यल्लो सांगली हॅपी स्ट्रीट, (२) सायंकाळी ५.३० ते ७ वा. संगीत नाट्यरंग (सांगलीच्या नाटकाचा सुवर्णकाळ ), (३) सायंकाळी ७ ते रात्री ९.३० या कालावधीत सुप्रसिद्ध गायिका 'ऐका दाजीबा फेम' वैशाली सामंत लाईव्ह. या कार्यक्रमासाठी रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

## गोमेवाडीच्या वैजयंतीकाकी देशपांडे यांचे निधन

**माणदेश एक्सप्रेस न्युज**



आटपाडी/प्रतिनिधी : गोमेवाडीचे माजी सरपंच विलासराव उर्फ पी.आर. देशपांडे यांच्या धर्मपत्नी वैजयंतीकाकी देशपांडे यांचे वृध्दापकाळ व अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले. त्या ७० वर्षाच्या होत्या.

अतिशय धाडशी जिगरबाज महिला कार्यकर्त्या म्हणून सर्वत्र नावलौकीक संपादन केलेल्या काकींच्या मागे पती, २ मुले १ मुलगी, सुना, जावई, नातवंडे, इतर नातलग असा मोठा परिवार आहे. पोलीस निरीक्षक राहूल देशपांडे यांच्या त्या मातोश्री होत. त्यांच्या तिसऱ्या दिवसाच्या रक्षाविसर्जनाचा धार्मिक विधी सोमवार दि ४ मार्च रोजी सकाळी ८.०० कदमवस्ती-देशपांडे मळ्यातल्या शेतात केला जाणार आहे.

# करगणीत भटक्या विमुक्त जाती जमातीतील नागरिकांच्यासाठी शिबीर संपन्न

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

आटपाडी/प्रतिनिधी : राज्यातील भटक्या विमुक्त जाती जमातीतील नागरिकांना शासनाच्या विविध योजनांचे लाभ मिळण्यासाठी कागदपत्रे उपलब्ध होत नाही. प्रामुख्याने जन्म दाखला, आधार कार्ड, मतदार ओळखपत्र, शिधापत्रिका, आयुष्यमान भारत आरोग्य पत्रिका, जात प्रमाणपत्र व जात पडताळणी प्रमाणपत्र यांची गरज असते ते मिळताना विविध समस्या व अडचणींचा सामना करावा लागतो. या अडचणी सोडविण्यासाठी या समाजातील नागरिकांना आधार कार्ड देण्याबाबत महिनाभरात प्राधान्यक्रमाने शिबिरांचे आयोजन करण्यात यावे, असे निर्देश महसूल, पशु संवर्धन व दुग्ध व्यवसाय विकासमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले. त्यानुसार आटपाडी तालुक्यातील करगणी येथे दिनांक २९ फेब्रुवारी रोजी भटक्या विमुक्तांसाठी विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

### शिबिरातील करण्यात आलेली कामे

तलाठी दाखले २२
सर्कल संजय गांधी अहवाल ०६
अन्नसुरक्षा चौकशी अहवाल ०७
फेरफार नोंदी ११
७/१२-खाते उतारे २४
आधार कार्ड ४८
प्रतिज्ञापत्र ०३
दुबार रेशन कार्ड १५
नाव कमी/वाढवणे ४८

या शिबिरामध्ये भटक्या विमुक्त जाती जमातीतील नागरीकांना आधारकार्ड, तलाठी उत्पन्न दाखले, संजय गांधी सर्कल अहवाल, अन्नसुरक्षा चौकशी अहवाल, फेरफार नोंदी, ७/१२ उतारे, प्रतिज्ञापत्रे, दुबार रेशन कार्ड इत्यादी कामे करण्यात आली असल्याची माहिती आटपाडीचे तहसीलदार सागर ढवळे यांनी दिली.

या शिबिरामध्ये तहसील कार्यालयाचे श्री. शिंगाडे, तलाठी श्री पुकळे, तलाठी निकम,मंडळाधिकारी बोंगाळे तसेच ऑपरेटर आधार केंद्र चालक, सेतू केंद्र चालक या सर्वांच्या मदतीने भटक्या विमुक्तांना वरील पद्धतीने लाभ देण्यात आला. यामध्ये संपत धनवडे यांच्या संस्थेने सर्व्हे करून आकडेवारी दिली होती.



आटपाडी : करगणी येथे भटक्या विमुक्त जाती जमातीतील नागरीकांना विविध दाखल्यांच्या बाबत आयोजित शिबिरात मार्गदर्शन करताना तहसीलदार सागर ढवळे

## * संपादकीय *

# राम सर्वांगे सावळा!

लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर मोदी सरकारने गुरूवारी सादर केलेल्या अंतरिम अर्थसंकल्पाच्या पहिल्या प्रतिक्रियांचा धुरळा खाली बसू लागल्यावर अनेक गोष्टी स्पष्ट होऊ लागल्या आहेत. 'या अंतरिम अर्थसंकल्पात मोदींनी मोठ्या घोषणा केल्या नाहीत,' असे कौतुकोद्गार काढणाऱ्यांना पाच वर्षांपूर्वी 'पंतप्रधान शेतकरी सन्मान योजने'सह तब्बल २० हून जास्त घोषणांची मुसळधार असलेल्या याच सरकारच्या अशाच लेखानुदानाचे इतक्यातच विस्मरण व्हावे हा योगायोग. फार मागे न जाता गेल्या दोन दशकांतील अशाच लेखानुदानांकडे नजर टाकली, तर सरकार कोणतेही असो, अर्थमंत्री कोणीही असोत, निवडणुकीपूर्वी लोकानुनयी घोषणांची संधी म्हणूनच ते त्याकडे बघत असतात. सन २००४ मध्ये जसवंतसिंह (अंत्योदय अन्न योजना, पंतप्रधान आरोग्य सुरक्षा योजना, लघु उद्योजक क्रेडिट कार्ड इ.), २००९ मध्ये प्रणव मुखर्जी (करसवलतीची मर्यादा १.१ लाख रुपयांवरून दीड लाखांपर्यंत वाढवणे, ज्येष्ठ नागरिक व महिलांसाठीही करमर्यादा वाढवणे, गरीब विधवांसाठी पेन्शन योजना, नरेगासाठी वाढीव तरतूद इ.) २०१४ मध्ये पी चिदंबरम (कारसह मोटारसायकल, स्कूटर, व्यावसायिक वाहनांवर व एसयूव्हीवरील उत्पादन शुल्क घटविणे इ.) २०१९ मध्ये हंगामी मंत्री पियूष गोयल (पाच लाख रुपयांपर्यंत उत्पन्न असलेल्यांना करातून संपूर्ण सूट व इतर सुमारे दोन डझन घोषणांचा पाऊस.) या पार्श्वभूमीवरच मोदींनी यावेळी लेखानुदानात करसवलतीसारख्या घोषणा पूर्ण टाळल्या, तेव्हा अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचे वाक्य सूचक होते, 'आम्ही (च) पुन्हा सत्तेवर येणार असल्याने जूनमध्ये पूर्ण अर्थसंकल्पात विकसित भारताचे चित्र आम्ही स्पष्ट करू....'

अंतरिम अर्थसंकल्पाचा ठळक सांगावा हाच की लोकसभा निवडणूक जिंकल्यातच जमा असल्याचा भाजपचा आत्मविश्वास. बाळबोध वाटला तरी प्रश्न असा, की यंदाच्या लोकसभेबाबत इतका जबर आत्मविश्वास पंतप्रधान मोदी, गृहमंत्री अमित शहा यांच्याकडे आला कोठून ? त्याचे पहिले उत्तर आहे, राममंदिराची स्वप्नपूर्ती, दिवसेंदिस तापत जाणारा काशी विश्वनाथ मंदिराचा मुद्दा व जोडीला तीन तलाकबंदी, कलम ३७० रद्द करण्यासह अन्य कायदे आणि दुसरे उत्तर आहे, कमालीच्या विस्कळीत विरोधकांमुळे मोकळे होणारे राजकीय मैदान. 'इंडि' आघाडीच्या ज्या चिंध्या होताना दिसतात, ते पहाता भाजप नेत्यांना मनातून हर्षवायूच होत आहे!

सन २००४ मध्येही 'अटलजींसमोर आहेच कोण,' असे वातावरण भाजपने तयार केले होते. पण तेव्हा सोनिया गांधी, डाव्यांचे भीष्माचार्य हरकिशनसिंग सुरजीत व ए. बी. वर्धन यांची निकालानंतरची सक्रियता विलक्षण होती. भाजप नकोच, ही भावना जोरदार होती. आता सोनिया गांधी यांना प्रकृती साथ देत नाही व अपवाद वगळता 'इंडिया' कडे तेवढ्या उंचीचे नेतृत्वच नाही, की जे सर्व विरोधकांना निवडणुकीनंतर का होईना एकत्र आणू शकेल. मात्र न्यासाठी भाजपचीही कामगिरी सन २००४ सारखी झाली पाहिजे व इथेच मेख आहे. कारण आताच्या भाजपच्या नेतृत्वाने पक्षाची सारी कार्यशैलीच ३६० अंशांत बदलून टाकली आहे. मोदी-शहा यांनी, यंदा ४०० पार ची घोषणा दिली ती उगाचच नाही. मुख्यतः महिला शक्तीच्या भरवशावर दक्षिणेतील पाच राज्यांसाठीही भाजपची खास योजना आहे. भाजप नेते-कार्यकर्ते कितीही उन्मादी अवस्थेत जावोत, पण हे दोन्ही सर्वोच्च नेते २४ तास संपूर्णपणे जमिनीवर असतात. 'इंडि' आघाडीच्या अवस्थेपाठोपाठ काँग्रेसला जिव्हारी लागणारा आणखी एक वार करण्याच्या मोहीमेत, बिहारनंतर व्हाया दिल्ली महाराष्ट्राकडे भाजप नेतृत्वाची नजर असल्याचे स्पष्ट संकेत आहेत. त्यादृष्टीने राज्यसभा उमेदवारीचा २७ फेब्रुवारी हा दिवस अत्यंत महत्वाचा ठरू शकतो. भाजपला यंदा राज्यातून सहा पैकी किमान तीन-चार जागा मिळतील. त्यापैकी एखादी जागा भाजप नेतृत्वाने एखाद्या दिग्गज काँग्रेस नेत्यासाठी राखून ठेवली असेल व त्या वाटाघाटी फलद्रूप होण्याच्या स्थितीत असतील तर... ?

राम मंदिरासह भावनिक मुद्दे कसे तापवायाचे व त्याच मुद्यावर काँग्रेससह विरोधकांना आणखी कोपऱ्यात कसे ढकलायचे, याची रूपरेषा भाजप मुख्यालयात तयार आहेच. 'कितीही प्राणपणाने लढलो तरी लोकसभेत आम्हाला सत्ता तर मिळू शकत नाही, मग आम्ही आमच्या विधानसभेचीच तयारी यानिमित्ताने का करू नये,' याच भावनेतून एकामागोमाग प्रादेशिक पक्ष 'इंडिया', पर्यायाने काँग्रेसपासून फारकत घेत असावेत.

स्वातंत्र्याला ७५ वर्षे उलटली तरी आरोग्य, रोजगार, शिक्षण यासारख्या मुद्यांपेक्षा प्रत्यक्ष निवडणुका जिंकण्यासाठी स्मशान-कबरस्तान वगैरे भावनिक, ध्रुवीकरणाच्या मुद्यांचाच आधार महत्वाचा का ठरतो, हा भारतीय राजकारणासाठीही आत्मपरीक्षणाचा विषय ठरावा. यंदा भाजपसाठी राममंदिर 'रामबाण' ठरून त्याची व्याप्ती हिंदी पट्टाही ओलांडून जाणार असल्याची चिन्हे तेव्हा जाणवतात, जेव्हा अयोध्येत रामलल्लाच्या दर्शनास गर्दी करणाऱ्यांमध्ये दाक्षिणात्य भाविकही प्रचंड संख्येने आहेत, अयोध्येत प्राणप्रतिष्ठेनंतर सोन्याचे अलंकार, पितांबर,धनुष्य-बाण अशा बालकरामाचे रूप पाहिले, की रामदासांचा पुढील अभंग आठवला -' हेम अलंकार पिवळा, राम सर्वांगे सावळा।'. लेखानुदानाचा अंतरिम 'अर्थ' अशा रितीने वेगळा असला, तरी भाजपच्या प्रचाररथाची चाके राममंदिर मुद्याचीच असतील हे वेगळे सांगायला नको. अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या सुरवातीलाच 'राम राम' चा जयघोष करणारे पंतप्रधान व सत्तारूढ भाजप हे याच संकल्पाकडून प्रचारात कोणती दिशा घेणार, हे पुरेसे स्पष्ट आहे.

# 'राष्ट्रीय' की 'राष्ट्रवादी' ?

राजकारणात अनेकदा कार्यकर्ते-जनतेतील प्रतिक्रिया आजमावून पाहण्यासाठी 'फेटाळणीयोग्य' चर्चा घडविल्याही जातात. त्यापैकी काही खऱ्या असतात, तर काही कपोलकल्पित. काही नेते तर अशा प्रकारे पाण्यावर खडे टाकून उठणारे तरंग मोजण्यात वाकबगार असतात. त्या पार्श्वभूमीवर सध्या तरी 'कथित' पातळीवर असलेले राष्ट्रवादी(शरश्चंद्र पवार)गटाच्या काँग्रेसमधील संभाव्य विलीनीकरणाचे राजकारणावर काय परिणाम होऊ शकतात, याबाबत....

'(तत्कालीन इंदिरा) काँग्रेस हाच राष्ट्रीय जीवनाचा मुख्य प्रवाह आहे. या प्रवाहापासून बहुजन समाजाने दूर राहू नये, हे सांगणे व त्याआधी स्वत: तसे करणे, हे माझे कर्तव्य होते. वैयक्तिक मानापमानापेक्षा बहुजन समाजाचे हित मला महत्त्वाचे वाटते...'

दिवंगत ज्येष्ठ नेते यशवंतराव चव्हाण यांची राजकीय वाट काँग्रेसपासून वेगळी झाली. कालांतराने अनेक घडामोडींनंतर त्यांनी पुन्हा काँग्रेसमध्ये सहभागी होण्याचा निर्णय घेतला, या काळात त्यांनी काढलेले हे उद्गार आठवण्याचे कारण म्हणजे गेल्या आठवड्यात राष्ट्रवादी काँग्रेस(शरश्चंद्र पवार) गट काँग्रेसमध्ये विलीन होणार, अशी चर्चा रंगली. लोकसभेच्या निवडणुकीच्या तोंडावर राजकारणाचा धुरळा उडत असतानाच या चर्चेने महाराष्ट्रात नवी वावटळ उठली. 'काँग्रेसचे निरीक्षक रमेश चेन्नितला यांनी शरद पवार यांच्याकडे याबाबतचा प्रस्ताव ठेवला आहे...,' 'त्यानंतर पवार गटाच्या पुण्यातील बैठकीत यावर चर्चा झाली...,' यांसह 'इंदिरा गांधी यांच्या सर्व विरोधकांनी एकत्र येऊन जनता पक्षाच्या एकाच चिन्हावर निवडणूक लढविली, त्याच पद्धतीचा 'इंडिया'तील पक्षांचा विचार आहे...' अशा अनेक चर्चा राजकीय वर्तुळात, पर्यायाने माध्यमे-समाजमाध्यमांतून रंगू लागल्या. पक्षाच्या नेत्यांनी लगोलग 'वावड्या','फेक न्यूज' असे म्हणत ही शक्यता फेटाळून लावली. मात्र, विविध पक्षांमध्ये खासगी वर्तुळात याबाबत चर्चा सुरू झाल्या आहेत. विशेषत: पवार गटाचे अनेक नेते या शक्यतेचा इन्कार करीत असताना काँग्रेसमधील कोणी वरिष्ठ नेते या विषयावर बोलण्यास तयार नाहीत, याकडेही अनेकजण लक्ष वेधत आहेत.

'राष्ट्रवादी' ने काय साधले ?

गेली २५ वर्षे राष्ट्रवादी काँग्रेस हा महाराष्ट्रातील राजकारणातला महत्त्वाचा प्रवाह ठरला आहे. या नव्या स्वतंत्र पक्षामुळे आर. आर. पाटील, जयंत पाटील, सुनील तटकरे अशा नव्या नेतृत्वाला संधी मिळाली. दुसरीकडे पवार बाहेर पडल्याने त्यांचे विरोधक असलेल्या काँग्रेसमधील निष्ठावंतांचीही राजकीय वाटचाल सुकर झाली. विशेषत: विलासराव देशमुख यांच्यासारख्या नेत्याला महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपदही मिळाले. सोनिया गांधी यांच्या विदेशी जन्माच्या मुद्द्यावरून राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना झाली. आता आता पुलाखालून बरेच पाणी वाहून गेल्यानंतर हा मुद्दा गैरलागू ठरला आहे. त्यामुळे स्वतंत्र अस्तित्व कशासाठी, या प्रश्नावर सर्वसामान्यांना पटेल, असे उत्तर नाही. त्यामुळेच अधूनमधून चालणाऱ्या विलिनीकरणाच्या चर्चांना बळ मिळते, हे विसरता येणार नाही.

खुद्द शरद पवार आणि काँग्रेस यांचे आणि काँग्रेसचे नाते 'तुझे नि माझे जमेना आणि तुझ्यावाचून करमेना,' असेच राहिले आहे. शेतकरी कामगार पक्षाची पार्श्वभूमी असलेल्या कुटुंबातून आलेल्या पवार यांचा राजकीय पिंड काँग्रेसमध्येच घडला आहे. काँग्रेसमधून बाहेर पडणे, पुरोगामी लोकशाही दलाच्या सरकारची स्थापना, पुन्हा काँग्रेस प्रवेश आणि १९९९ मध्ये पुन्हा बाहेर पडून राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना, असा त्यांचा प्रवास देशाला ज्ञात आहे. त्यामुळे या टप्प्यावर तेही आपले राजकीय गुरू यशवंतराव चव्हाण यांचा काँग्रेस पुनरागमनाचा कित्ता गिरवत 'राष्ट्रीय' (इंडियन नॅशनल काँग्रेसची) वाट निवडणार, की 'राष्ट्रवादी' (काँग्रेस) द्वारे स्वतंत्र वाटचाल कायम ठेवणार, याची मोठी उत्सुकता आहे.

राजकारणात जाहीरपणे कोणी काही बोलले, तरी पडद्यामागे अनेक हालचाली सुरू असतात. एखाद्या विषयावर काय प्रतिक्रिया उमटतात, हे जाणून घेण्यासाठी अशा चर्चा-पुड्या सोडून दिल्या जातात. एखादा डॉक्टर हृदयाचे ठोके मोजतो, तशाच या चर्चा 'स्टेथास्कोप' चे काम करीत असतात. त्या पार्श्वभूमीवर या सध्या तरी 'कथित' पातळीवर असलेल्या विलिनीकरणाचे फायदे-तोटे काय असू शकतात, याचा आढावा औचित्याचा ठरावा.

संभाव्य फायदे

-शरद पवार आणि त्यांच्यासोबत मोठ्या संख्येने काँग्रेस विचाराच्या नेत्यांची फळी काँग्रेसबाहेर राहणे, हेच महाराष्ट्राच्या राजकारणात नैसर्गिक नाही, असे पक्षाच्या स्थापनेपासून अनेक अभ्यासकांचे मत आहे.

-घड्याळ हे चिन्ह गमावल्यानंतर नव्या चिन्हाच्या शोधात आणि ते जनतेपर्यंत पोहोचविण्याच्या चिंतेत असलेल्या उमेदवारांना वर्षानुवर्षे जनतेत रुजलेले 'पंजा' चिन्ह मिळेल.

-कितीही पीछेहाट झाली असली, तरी काँग्रेसची म्हणून देशभरात सुमारे वीस टक्के मते आहेत.

-'पंजा'चिन्हास मिळणारी अल्पसंख्याक, दलित समाजाची काँग्रेसची हक्काची मते या गटाच्या उमेदवारांना मिळू शकतात.

-विशेषत: नव्या पिढीसाठी राष्ट्रीय प्रवाहात सहभागी होऊन दीर्घ पल्ल्याचे राजकारण करण्याचा मार्ग

- काँग्रेस संघटनाही अनेक जिल्ह्यांमध्ये ताकदवान नाही. तिला राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांचे बळ मिळू शकते.

-पवार गटाच्या अनेक नेत्यांचे सहकारी संस्था-शिक्षण संस्थांवर वर्चस्व आहे, ही ताकद काँग्रेसच्या पाठीशी उभी राहू शकते.

-शरद पवार यांच्यासारख्या मुरब्बी नेत्याचे मार्गदर्शन काँग्रेस पक्षाला मिळणार, गळती लागलेल्या काँग्रेसलाही नव्या नेत्यांची गरज.

- गेल्या काही काळापासूनच्या भाजपशी छुप्या समझोत्याच्या आरोपांना हे उत्तर ठरू शकते.

- लोकसभा-विधानसभा एकत्र लढविणाऱ्या या पक्षांची मते गेली २५ वर्षे बहुतांश प्रमाणात परस्परांना 'ट्रान्सफर' होत आहेत. त्यामुळे मतदारांना समजावणे कठीण नाही.

-या संभाव्य विलिनीकरणाने नेते-कार्यकर्त्यांचे मनोबल वाढू शकते. विशेषत: सत्तेची चाहुल लागली, तर दोन्ही पक्षांना लागलेल्या गळतीला लगाम बसू शकेल.

-देशात दुसऱ्या क्रमांकाच्या, लोकसभेच्या ४८ जागा असलेल्या महाराष्ट्रासारख्या राज्यात भाजपला रोखता आले, तर देशाच्या समीकरणांवरही बदल शक्य.

संभाव्य तोटे

-सत्तेमध्ये असलेल्या (भाजपसारख्या) पक्षात विलीन होण्याच्या तुलनेत विरोधी पक्षात असलेल्या काँग्रेससारख्या पक्षात विलीन होण्यासाठी लोकप्रतिनिधी-कार्यकर्ते अनुत्सुक असतात, त्यांची समजूत काढण्याचे आव्हान

- अनेक मतदारसंघांमध्ये गेल्या २५ वर्षांत काँग्रेस आणि राष्ट्रवादी असे कार्यकर्त्यांचे केडर आणि गल्ली ते दिल्ली लोकप्रतिनिधी व संभाव्य उमेदवार उभे राहिले आहेत. एकत्रीकरणानंतर यापैकी एकालाच निवडणुकीत व संघटनेतही संधी मिळू शकते.

-दोन्ही पक्षांनी लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुका



एकत्र; मात्र, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वतंत्रपणे लढविल्या, आता विलिनीकरण झाले, तर संधी गमावलेल्यांकडून बंडखोरी किंवा इतरत्र पक्षांतर होण्याची शक्यता

- काँग्रेस संस्कृतीप्रमाणे दिल्लीच्या 'हायकमांड' चा वरचष्मा वाढणार, त्यामुळे स्थानिक सुभेदाऱ्यांना धक्का लागण्याची शक्यता

-त्यामुळे निर्णयप्रक्रियाही लांबणार

-काँग्रेसमधील पवार विरोधी गट आणि पवार समर्थक परस्परांशी जुळवून घेणार का, हा प्रश्न.

-नेते एकत्र आले, तरी तळागाळातील कार्यकर्त्यांचे मनोमीलन होण्यासाठी वेळ द्यावा लागणार

-काही मुद्द्यांवर दोन्ही पक्षांच्या नेत्यांमध्ये मतभेद. विशेषत: राहुल गांधी हे उद्योगपती अदानी यांच्यावर हल्ले करतात, तर शरद पवार यांची त्या मुद्द्यावर वेगळी मते आहेत.

# सुनील गावस्करांनी आपला शब्द फिरवला

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**




नवी दिल्ली : भारताचे माजी कर्णधार आणि समालोचक सुनील गावस्कर यांनी आपला शब्द फिरवला असल्याचे चाहते म्हणत आहेत. कारण गावस्कर यांनी आता चेन्नई सुपर किंग्सचा कर्णधार महेंद्रसिंग धोनीबाबत एक वक्तव्य केले आहे. त्यानंतर चाहत्यांनी गावस्कर यांनी आपले शब्द बदलल्याचे म्हटले आहे.

सुनील गावस्कर हे निष्णात कर्णधार आणि तंत्रशुद्ध फलंदाज होतेच, पण त्यांचे समालोचनही चर्चेचा विषय असतो. भारत आणि इंग्लंडचा कसोटी सामना सुरु असताना ते समालेचन करत असताना महेंद्रसिंग धोनीचा विषय त्यांनी काढला होता. भारताचा युवा यष्टीरक्षक ध्रुव जुरेलबाबत ते यावेळी बोलत होते. गावस्कर जुरेलबाबत म्हणाले होते की, ध्रुव ज्या पद्धतीने खेळाचा विचार करतो, परिस्थिती समजून घेऊन फलंदाजी करतो त्यामुळे मला एमएस धोनीची आठवण येते. तो मध्येत एक षटकार मारतो आणि नंतर एक किंवा दोन धावा देऊन स्ट्राइक रोटेट करतो. किपिंगमध्येही त्याने अवघड थ्रो पकडला आणि बेन डकेटला धावबाद केले आणि रिव्हर्स स्वीप खेळण्याचा प्रयत्न करणाऱ्या अँडरसनचा अप्रतिम झेल घेतला. त्यामुळे जुरेलला पाहिल्यावर मला धोनीचीच आठवण येते.

सुनील गावस्कर आता धोनीबाबत म्हणाले की, महेंद्रसिंग धोनी जर त्याच्या वयाचा असता तर अशा परिस्थितीत त्याने अशीच कामगिरी केली असती. पण कोणीही एमएस धोनी बनू शकत नाही. फक्त एक धोनी आहे. पण ध्रुव जुरेलने धोनीने जे काही केले आहे त्याच्या काही टक्के जरी काम केले तर ते भारतीय क्रिकेटसाठी विलक्षण ठरेल.

# मराठी भाषेचे सौंदर्य सर्वांना भुरळ पाडणारे:प्रा.डॉ.विजय कुंभार

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

सातारा: मराठी साहित्य हे खूप समृद्ध आहे, मराठी भाषा ही आपली मातृभाषा आहे. ही भाषा आणखी उन्नत झाली पाहिजे यासाठी लेखन व आविष्कार करण्याची मला गरज वाटत आहे. म्हणी, वाक्प्रचार ,अनेक वेगवेगळे आविष्कार आपल्याला जीवन जगताना पदोपदी मार्गदर्शन करतात .समाजाला दिशा देणारा आशय मराठीत सतत आला पाहिजे यातूनच ती ज्ञानभाषा म्हणून वर्धिष्णू होत जाईल.मराठी भाषेबाबत सतत जनजागृती होण्याची,आणि भाषेचे नवनवीन ग्रंथ वाचन करण्याची खूप गरज आहे.कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ मराठी भाषेच्या अभ्यासासाठी मोठे योगदान देईल.खरेच मराठी भाषेचे सौंदर्य अवर्णनीय असून ते सर्वांना भुरळ पाडणारे आहे. असे मत कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव प्रा.डॉ.विजय कुंभार यांनी व्यक्त केले.

ते येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाचे भाषामंडळ व छत्रपती शिवाजी कॉलेजचा मराठी विभाग यांनी उच्चतर शिक्षा अभियान अंतर्गत आयोजित केलेल्या'मराठी पटकथा लेखन, दिग्दर्शन,तंत्रशिक्षण,व अभिनय प्रशिक्षण' कार्यक्रमाचे उदघाटन करताना बोलत होते.अध्यक्षस्थानी छत्रपती शिवाजी कॉलेजचे प्राचार्य डॉ.राजेंद्र मोरे हे होते. विद्यापीठाच्या मानव्यविद्या शाखेचे अधिष्ठाता प्रा.डॉ.अनिलकुमार वावरे, भाषामंडळाचे प्रभारी संचालक व मराठी विभाग प्रमुख डॉ.सुभाष वाघमारे,पटकथा व कादंबरी लेखक निलेश महिगावकर,जागतिक चित्रपटाचे अभ्यासक गिरीश पाटील, चित्रपट सहायक दिग्दर्शक साईराज भोसले, नाट्यकर्मी व अभिनेते पंकज काळे अभिनय प्रशिक्षक गणेश धावडे इत्यादी मान्यवरांची उपस्थिती यावेळी होती.




कार्यशाळा उद्घाटन कार्यक्रमात विचार व्यक्त करताना कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव प्रा.डॉ.विजय कुंभार, गणेश धावडे, साईराज भोसले, पंकज काळे,निलेश महिगावकर,प्राचार्य डॉ.राजेंद्र मोरे,डॉ.अनिलकुमार वावरे व प्रा.डॉ.सुभाष वाघमारे

अध्यक्षीय भाषणात डॉ.राजेंद्र मोरे म्हणाले 'ग्रामीण भागातील सातारा परिसरातील जे चित्रपट ,मालिकाशी निगडीत कलावंत आहेत, त्यांनी आपल्या प्रतिभेने नावलौकिक वाढवला आहे ,त्यांचा मला खूप अभिमान वाटतो. कौतुक वाटते.एकापेक्षा एक दर्जेदार कलाकृती ते निर्माण करत आहेत.परंतु या सर्वांनी सातारा येथील छत्रपती शिवाजी कॉलेजच्या मराठी विभागात एकत्र येण्याची आवश्यकता वाटत आहे. आपण ज्यांना आवड आहे असे विद्यार्थी एकत्र करून,त्यांना आविष्कार करण्यास व बोलण्यास संधी देऊ व त्यांना योग्य दिशा देऊ ,विद्यापीठ व महाविद्यालय यासाठी सर्व प्रकारची जबाबदारी घेईल' असे ते म्हणाले.

शिरवाडकर यांच्या साहित्यिक योगदानाबद्दल पुढे बोलताना ते म्हणाले की 'कुसुमाग्रज हे जागतिक दर्जाचे मानवतावादी कलावंत होते,नटसम्राट असो,किंवा क्रांतीचा जयजयकार असो,किंवा त्यांची सतत चिंतन करत जाणारी कविता असो,मराठी भाषेतून त्यांनी जे लेखन केले आहे ते मानवतावादाचा संस्कार करणारे आहे.मला प्रत्यक्ष पाहण्याची संधी मिळाली,मानवी कल्याणाची काळजी असलेली त्यांची कविता केवळ काल्पनिक नसून ती जीवनातील वैषम्य चित्रित करून चांगले काय आहे त्या दिशेने जाण्याचे सूचन करते' असे मत त्यांनी व्यक्त केले.

प्रारंभी वि.वा.शिरवाडकर यांच्या प्रतिमेस फुले अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाच्या भाषामंडळाचे संचालक प्रा.डॉ. सुभाष वाघमारे यांनी प्रास्ताविक केले. आभार प्रा.डॉ.विद्या नावडकर यांनी मानले.या कार्यक्रमास प्रा. डॉ. कांचन नलवडे,प्रा. डॉ. संजयकुमार सरगडे,प्रा. प्रियांका कुंभार, प्रा. श्रीकांत भोकरे , प्रा.मनोहर निकम, इर्जिक प्रकाशनचे हरीश भोसले, कॉलेजचे विद्यार्थी, धनंजयराव गाडगीळ वाणिज्य महाविद्यालयाचे विद्यार्थी यावेळी उपस्थित होते.

# कोयना धरणग्रस्तांच्या लाँग मार्चची विजयी सांगता

***पाटण/प्रतिनिधी:-***

कोयना प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाबाबत शुक्रवारी आयुक्त कार्यालयात बैठक होऊन त्यामध्ये जमीनी वाटपाबाबत सकारात्मक पाऊले उचलली जात असून दि. ५ मार्चला उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासोबत बैठकीचे पत्र मिळाल्याने शुक्रवारी सायंकाळी कोयना प्रकल्पग्रस्तांच्या लाँग मार्चची विजयी सांगता केल्याचे डॉ. भारत पाटणकर यांनी जाहीर केले.

कोयना प्रकल्पग्रस्तांची गुरुवारी कोयना ते मंत्री शंभुराज देसाई यांच्या मरळी येथील निवासस्थानावर लाँग मार्चची सुरवात केली होती. शुक्रवारी मिळालेल्या बैठकीच्या पत्रामुळे या लाँग मार्चची सांगता करताना सचिन कदम, हरिश्चंद्र दळवी, चैतन्य दळवी, श्रीपती माने, यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी सिताराम पवार, विनायक शेलार, महेश शेलार, शिवाजी कांबळे, जगाबाई कदम, अनुसया कदम, परशुराम शिर्के, आदी उपस्थित होते.

आयुक्त कार्यालय मध्ये कोयना पुनर्वसन संबंधित बैठक आयोजित केली होती. त्या बैठकी वेळी मंत्री अनिल पाटील यांच्या सोबत श्रमिक मुक्ती दल कोयनेच्या प्रश्नाबाबत झालेल्या बैठकीचे इतिवृत्त प्राप्त झाले. त्या मध्ये जमीन वाटप करण्यासंदर्भात स्पष्टपणे निर्देश दिले गेलेले आहेत. जमीन वाटप करण्याच्या अडचणी दूर झालेल्या आहेत. जे प्रस्ताव तयार झालेले आहेत. त्यातील काही प्रस्ताव मंत्रालय स्तरावर पाठवले आहेत. काही पाठवायचे बाकी आहेत. त्या सगळ्या प्रस्तावांना ज्या आधारे पाठवायचे आहे त्या पद्धतीने पाठवण्यात यावे जेणेकरून जमीन वाटप करण्यासाठी कोणताही अडथळा येणार नाही. त्या इतिवृत्तामध्ये पुनर्वसन प्राधिकरणाची परवानगी किंवा पुनर्वसन प्राधिकरणाची कोणतीही अट घातली नसल्यामुळे जमीन वाटप करण्याबाबत कोणतीच अडचण उरलेली नाही. अशा पद्धतीची चर्चा आयुक्त यांच्यासोबत देखील उर्वरित प्रस्ताव आयुक्त मार्फत मंत्रालय स्तरावर जाण्यासाठी आचारसंहितेची देखील कोणतीच अडचण उरलेली इतर धोरणात्मक निर्णयासाठी किंवा पुनर्सन बाबतीत इतर निर्णय होण्यासाठी प्राधिकरण ची बैठक घेण्याचे अंमल सांगितले गेले होते. ती बैठक दि– ५ मार्च २०२४ रोजी सकाळी दहा वाजता घेण्यात येणार आहे. त्या बैठकीला प्राधिकरण अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार हे उपस्थित असतील अशा पद्धतीचे पत्र त्यांच्या कार्यालयाकडून आज आम्हाला मिळाले. त्यामध्ये प्राधिकरणाच्या होणाऱ्या बैठकीपूर्वी श्रमिक मुक्ती दलासोबत बैठक घेऊन महत्वाच्या धोरणात्मक विषयी चर्चा होणार आहे. असे डॉ. भारत पाटणकर यांनी सांगितले.



## लोकशाही चिरडण्याचा केविलवाणा प्रयत्न:चैतन्य दळवी

पालकमंत्र्यांनी बैठक आयोजित करण्याऐवजी प्रशासनाचा दुरूपयोग करून कोयना प्रकल्पग्रस्तांचा लाँग मार्च अडवला यामुळे प्रकल्पग्रस्तांमधुन तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. अधिवेशन सुरु आसताना शासनाने याची गांभीर्याने दखल घेऊन मागण्या मान्य करणे गरजेचे होते. प्रशासनाकडून दबावतंत्राने लोकशाही चिरडण्याचा हा केविलवाणा प्रयत्न सुरु आहे.

दैनिक माणदेश एक्सप्रेस हे पत्रक श्री. शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक, मालक श्री. दीपक गौतम प्रक्षाळे यांच्यासाठी कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२, महावीरनगर, सांगली. पीन ४१६४१६ महाराष्ट्र येथे छापून विठ्ठलनगर, आटपाडी, ता. आटपाडी, जि. सांगली पिन– ४१५३०१ महाराष्ट्र येथून प्रसिद्ध केले. या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इ. विषयी संपादक, मुद्रक, प्रकाशक, मालक सहमत असतीलच असे नाही. RNI Reg.No- MAHMAR/2017/77021 (आटपाडी न्यायक्षेत्र)

# सांगली जिल्हा नंदीवाले समाज संघटनेच्या अध्यक्षपदी मोहनराव भिंगार्डे

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

इस्लामपूरः सांगली जिल्हा नंदीवाले समाज संघटने च्या अध्यक्षपदी मोहन विलासराव भिंगार्डे (इस्लामपूर) यांची बिनविरोध निवड करण्यात आली. सांगली येथे राज्य संघटनेचे निरीक्षक रावसाहेब चौगुले, ज्ञानेश्वर जाधव, महेश नंदीवाले, गणेश पवार यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये, संघटनेचे पदाधिकारी व समाज बांधवां च्या बैठकीमध्ये ही निवड करण्यात आली.

यावेळी नूतन अध्यक्ष मोहन विलासराव भिंगार्डे यांचा समाजाच्या वतीने जाहीर सत्कार करण्यात आला. यावेळी जिल्हा उपाध्यक्ष पदी भास्करराव देशमुख (निमणी),जिल्हा कार्याध्यक्ष पदी भीमराव जाधव मिरज (सुभाषनगर), जिल्हा सचिव पदी भीमराव मोकाशी (सांडगेवाडी), जिल्हा खजिनदार अशोकराव मोकाशी (नवेखेड) यांचीही बिनविरोध निवड करण्यात आली.

अखिल महाराष्ट्र राज्य नंदीवाले समाज संघटना संघटनेचे संस्थापक हणमंतराव पवार, संघटनेचे राज्याचे अध्यक्ष अर्जुनराव पवार, संघटनेचे राज्याचे उपाध्यक्ष अशोकराव भोसले, सतिशराव वाडकर, संघटनेचे राज्याचे कार्याध्यक्ष शामराव पवार जुनोनी, तसेच ज्येष्ठ पंच विलासराव मोकाशी निमणी,बाबुराव जाधव कासेगाव, लक्ष्मण जाधव ढवळीकर महाराज, रामभाऊ भोसले दुधोडी, मसाप्पा नंदीवाले,बाबुराव नंदीवाले कोथळी, यल्लाप्पा चव्हाण, विलास चौगुले गोटखिंडी, रावसाहेब मोकाशी, राजाराम देशमुख, शिवाजीराव जाधव, शिवाजीराव देशमुख, चंद्रकांत भिंगार्डे, तानाजी जाधव, अरुण मोकाशी यांच्यासह समाजातील जेष्ठ कार्यकर्ते व युवकांनी नूतन अध्यक्ष व पदाधिकाऱ्यांचा सत्कार करून त्यांना शुभेच्छा दिल्या.

मोहन भिंगार्डे हे इस्लामपूर (हनुमाननगर) येथील युवक कार्यकर्ते असून ते गेल्या अनेक वर्षापासून माजी मंत्री आ. जयंतराव पाटील यांच्या नेतृत्वाखाली सार्वजनिक क्षेत्रात काम करीत आहेत. नंदिवाले समाजात रेशनकार्डाचे कामे,निराधार पेन्शन, जातीचे दाखले, नगरपालिकेचे कामे, तहसिलद कार्यालय मधील कामे,पोलीस स्टेशन कामे,समाजावर होण्यार्या अनाया विरोधात नेहमीच आवाज उठवनेचे काम केलेले आहे येथुन पुढेही करणार अशी ग्वाही नुतन जिल्हा अध्यक्ष मोहन भिंगार्डे यांनी दिली राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या भटक्या विमुक्त सेलचे इस्लामपूर शहराध्यक्ष असून नंदीवाले समाजाचे जेष्ठ नेते विलासराव भिंगार्डे यांचे चिरंजीव आहेत. जिल्ह्यातील सर्व समाज बांधव यांनी अभिनंदन केले आहे

# हातकणंगले लोकसभेची निवडणूक स्वतंत्रपणे लोकांच्या लोकवर्गणीतून लढवणार

**इस्लामपूर/प्रतिनिधीः-**

तांबवे (ता.वाळवा)येथे हातकणंगले लोकसभा निवडणुकीच्या तयारीसाठी सांगली जिल्हा कार्यकर्ता अभ्यास शिबीर प्रसंगी ते बोलत होते.

येणारी यावेळी बोलताना शेट्टी म्हणाले की हातकणंगले लोकसभेची निवडणूक सुद्धा मी लोकवर्गणीतूनच लढवणार आहे. ती स्वतंत्रपणे शेतकऱ्यांच्या जीवावर निवडणूक एक नोट व एक बोट या तत्त्वावर निवडणूक २२ वर्षानंतर सुद्धा मतदार संघात आपल्याला निवडणुकीत उमेदवाराला पैसे द्यावे लागतात हा विश्वास मतदारांच्यात जागृत ठेवला ही गोष्ट अभिमानास्पद आहे , कोल्हापूर येथे हायवे रोखल्या मुळ कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील १५ लाख शेतकऱ्यांना ६५० कोटी रुपये मिळवून दिले आहेत, यावेळी निवडणूक मी स्वतंत्र लढणार आहे, लोक मला स्वतःच्या वर्गणी गोळा करून माझी निवडणूक हातकणंगले लोकसभा मतदारसंघातील शेतकऱ्यांनी हातात घेणार आहे. त्यामुळे मला या निवडणुकीची काळजी नाही,माजी खासदार राजू शेट्टी यांनी सांगितले.

यावेळी जिल्हाध्यक्ष महेश खराडे, भागवत जाधव,पोपट मोरे, शिवाजीराव पाटील, अँड एस् यु सन्दे संदिप राजोबा, संजय बेले यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रा.संजय थोरात यांनी शेतकरी संघटना व वाटचाल याविषयी मार्गदर्शन केले .ते म्हणाले, शेती आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नावरती व्यापक जनजागृती करण्यात स्वाभिमानी शेतकरी संघटनेला यश



आले आहे. असंघटित असणारा शेतकरी संघटित होऊ लागला. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर लढणारे एकमेव नेतृत्व म्हणजे राजू शेट्टी असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही.

भागवत जाधव यांनी सुत्रसंचलन केले. रविकिरण माने यांनी आभार मानले.

यावेळी शिवाजी पाटील,शंकर पाटील, उत्तम जाधव, दत्ताजी पाटील, रामचंद्र जाधव, सुशांत पाटील, दिलीप जाधव, भास्कर मोरे, यशवंत पाटील प्रकाश देसाई, प्रदीप पाटील, संतोष शेळके सह उपस्थित होते.

# मेघाची कावड उदंड हाय ; कोल्हापुरातील गडमुडशिंगी येथील त्रैवार्षिक यात्रेत भाकणूक

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

गांधीनगर : 'मेघाची कावड उदंड हाय, पांढरीचे रक्षण करीन, बाळगोपाळांना सुरक्षित ठेवीन व रोगराई हटवीन, तसेच भगवा जगावर राज्य करील,' अशी भाकणूक देवऋषी यांनी केली. या वर्षी पर्जन्यमान समाधानकारक होईल, देशाच्या राजकारणात भगवा फडकंल, पीक पाणीही उदंड होण्याचे भाकीत गडमुडशिंगी येथील श्री धुळसिद्ध बिरदेव त्रैवार्षिक जळयात्रेतील भाकणुकीत वाशी येथील देवऋषी भगवान पुजारी व गडमुडशिंगी येथील गणपती पुजारी यांनी वर्तवले.

या वर्षी धुळसिद्ध बिरदेव त्रैवार्षिक जळयात्रेस महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेश व गोवा या राज्यांतून हजारो भाविकांनी उपस्थिती दाखवत मोठ्या उत्साहात सर्व धार्मिक कार्यक्रम पार पाडले. यामध्ये रविवारी (दि.२५) करसिद्ध माळीतून पालखीचे धुळसिद्ध बिरदेव मंदिरात आगमन, रात्री खणाची मेंढी व सोमवारी ( दि. २६) गुरुशिष्य भेट व २१ गावांतील सुवासिनींचे पूजन करण्यात आले. मंगळवारी (दि २७) रोजी अभूतपूर्व उत्साहात जळ काढण्यात आला. नवीन तयार केलेल्या रथातून कर हातात घेतलेल्या सिद्धांसह मोठ्या संख्येने ढोल-कैताळांच्या निनादात जळविधी पार पडला. बुधवार, दि. २८ रोजी खाटीक बोनी, तर २९ तारखेला गाव बोनीने भाविकांकडून खारा-नैवेद्य गोडा नैवेद्य देवाला अर्पण करण्यात आला. शुक्रवारी (दि. १) आंबील बोनीने यात्रेची सांगता झाली.

ग्रामपंचायत प्रशासनाकडून नेटके नियोजन केले. पिण्याच्या पाण्यासह स्वच्छतेची व यात्रेतील सर्व दुकानांची व्यवस्था उत्तम राखली होती व संपूर्ण गावात सर्व मंदिरांवर व शिवाजी चौकामध्ये आकर्षक विद्युत रोषणाई केली होती. या संपूर्ण याचा काळात शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी गांधीनगर पोलिसांकडून विशेष परिश्रम घेण्यात आले.

# डॉ.सुरेश भोसले यांचा सामाजिक सेवा पुरस्काराने सन्मान

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

कराड: कराड तालुक्यातील शेरे, दुशेरे, गोंदी व खुबी आणि वाळवा तालुक्यातील लवंडमाची ग्रामपंचायतीच्यावतीने कृष्णा विश्व विद्यापीठाचे कुलपती डॉ. सुरेश भोसले यांचा सामाजिक सेवा पुरस्काराने सन्मान करण्यात आला. डॉ. भोसले यांनी वैद्यकीय व सामाजिक क्षेत्रात दिलेल्या भरीव योगदानाबद्दल हा नागरी सत्कार करण्यात आला. यावेळी कृष्णा विद्यापीठाच्या दंतविज्ञान विभागाचे अधिष्ठाता डॉ. शशिकिरण एन. डी. यांचाही विशेष सन्मान करण्यात आला. व्यासपीठावर माजी आमदार आनंदराव पाटील, य. मो. कृष्णा सहकारी साखर कारखान्याचे संचालक धोंडिराम जाधव, बाजीराव निकम, दयानंद पाटील, कृष्णा बँकेचे संचालक नारायण शिंगाडे, माजी पं.स. सदस्य



शेरे : कृष्णा विश्व विद्यापीठाचे कुलपती डॉ. सुरेश भोसले यांचा सामाजिक सेवा पुरस्काराने सन्मान करताना शेरे, दुशेरे, गोंदी, खुबी व लवंडमाची ग्रामपंचायतीचे सरपंच व अन्य मान्यवर.

बाळासाहेब निकम, कृष्णा विद्यापीठाचे कुलसचिव डॉ.एम.व्ही. घोरपडे, इनोव्हेशन न्ड इनक्युबेशन सेंटरचे संचालक डॉ.डी.के. अगरवाल, डॉ.आशा काकडे, डॉ. सतीश काकडे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी सत्काराला उत्तर देताना डॉ. भोसले म्हणाले, ग्रामीण भागातील लोकांनी एकत्र येऊन केलेला हा सन्मान माझ्यासाठी खूप आनंददायी आहे. 'भागाचा सर्वांगीण विकास झाला; तर समाजाची प्रगती होते', हा आप्पांनी दिलेला विचार पुढे नेण्यासाठी आम्ही कृष्णा विद्यापीठाच्या माध्यमातून शेरे, दुशेरे, गोंदी, खुबी व लवंडमाची ही गावे दत्तक घेतली. याठिकाणी आरोग्याच्या सुविधा उपलब्ध करुन देण्याबरोबरच पिण्याचे शुद्ध पाणी, सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन या बाबींकडे लक्ष देऊन सुधारणा केल्या जात आहेत. कृष्णा परिवाराने शेती, आरोग्य, शिक्षण, आर्थिक अशा क्षेत्रात भरीव योगदान दिले असून, या कामात परिसरातील लोकांकडून मोठे सहकार्य लाभले आहे. भविष्यातही या सर्वांगीण प्रगतीसाठी सर्वांनी साथ द्यावी, असे आवाहन त्यांनी केले.

माजी आमदार आनंदराव पाटील म्हणाले, डॉ. सुरेशबाबा हे आप्पासाहेबांच्या विचारांचा व कार्याचा वारसा पुढे नेत आहेत. त्यांच्या रुपाने या भागाला एक प्रामाणिक व दूरदृष्टीचे नेतृत्व लाभले आहे. कोराना काळात त्यांनी हजारो कुटुंबांना संकटातून वाचविले. त्यांच्या या सामाजिक कार्याचा ५ गावांमधील ग्रामस्थांनी एकत्र येऊन केलेला सन्मान सोहळा अतिशय स्तुत्य उपक्रम आहे. यावेळी शेरेच्या सरपंच शीतल निकम, दुशेरेचे सरपंच आनंदा गायकवाड, गोंदीचे सरपंच सुबराव पवार, खुबीच्या सरपंच जयश्री माने व लवंडमाचीच्या सरपंच छाया दुर्गावळे यांच्यासह उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लोकसभेसाठी तिकीट कापल्यानंतर माजी आरोग्य मंत्री डॉ. हर्षवर्धन यांचा राजकारणालाच राम-राम

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

नवीदिल्लीःदिल्लीमधील चांदणी चौकचे खासदार आणि भाजपाचे वरिष्ठ नेते डॉ. हर्षवर्धन यांनी राजकारणाला राम राम ठोकून निवृत्ती जाहीर केली आहे. आगामी लोकसभा निवडणुकीसाठी भाजपाने त्यांचे तिकिट कापल्यानंतर त्यांनी हा निर्णय जाहीर केला. शनिवारी भाजपाने दिल्लीतील पाच लोकसभा मतदारसंघासाठी उमेदवारांच्या नावांची घोषणा केली. यामध्ये चांदणी चौक येथून प्रवीण खंडेलवाल यांना तिकीट देण्यात आले आहे.

डॉ. हर्षवर्धन हे याच मतदारसंघातून पाच वेळा आमदार आणि दोन वेळा खासदार राहिले आहेत. त्यांनी केंद्रीय आरोग्य आणि पर्यावरण मंत्री म्हणून काम केले होते. आपल्या एक्स अकाऊंवर भली मोठी पोस्ट लिहून डॉ. हर्षवर्धन यांनी या निर्णयाची माहिती दिली. तसेच राजकारणातून बाजूला झाल्यानंतर पूर्व दिल्लीच्या कृष्णा नगर भागात असलेल्या आपल्या दवाखान्यावर लक्ष देणार असून कान-नाक-घसा तज्ज्ञ म्हणून वैद्यकीय सेवा देण्याचे काम करणार असल्याचेही त्यांनी जाहीर केले.

डॉ. हर्षवर्धन यांनी आपल्या दीर्घ पोस्टमध्ये लिहिले की, तीस वर्ष माझी अतिशय सुरेख अशी राजकीय कारकिर्द राहिली. पाच वेळा विधानसभा आणि दोन वेळा लोकसभा निवडणुकीत मला मोठ्या फरकाने लोकांनी जिंकून दिलं. या काळात पक्षात आणि सरकारमध्ये महत्त्वाची पदे भूषविण्याची संधी मला मिळाली. आता मी यातून बाहेर पडत असून पुन्हा एकदा माझ्या मूळ कामाला मी जात आहे.

डॉ. हर्षवर्धन पुढे लिहितात, कानपूरच्या जीएसव्हीएम वैद्यकीय महाविद्यालयातून एमबीबीएसचे



शिक्षण घेतल्यानंतर पहिल्या दिवसापासून मी गरिबांना आणि गरजूंना मदत करणे, हेच माझे ध्येय ठेवले. तत्कालीन राष्ट्रीय स्वंयसेवक संघातील नेतृत्वाच्या आग्रहामुळे मी राजकारणात प्रवेश केला होता.

मी एक स्वंयसेवक आहे. शेवटच्या माणसापर्यंत सेवा पोहोचली पाहीजे, या पंडित दिनदयाल उपाध्याय यांच्या अंतोदय तत्त्वज्ञानाने भारावून जात आजवर मी कार्यरत राहिलो. तेव्हाच्या आरएसएसच्या नेत्यांनी मला राजकारणात येण्याची समजूत घातली, म्हणून मी निवडणुकीला उभा राहिलो. राजकारण म्हणजे आपल्या तीन प्रमुख शत्रूंशी लढण्याचे एक साधन आहे, अशी माझी समजूत घालण्यात तेव्हा ते नेते यशस्वी ठरले. गरीबी, रोग आणि अज्ञान हे मानवाचे तीन प्रमुख शत्रू आहेत, असे मी मानतो, अशी भावना डॉ. हर्षवर्धन यांनी आपल्या पोस्टमध्ये व्यक्त केली.

डॉ. हर्षवर्धन यांच्या ऐवजी ज्यांना उमेदवारी दिली, ते प्रवीण खंडेलवाल हे व्यावसायिक असून अखिल भारतीय व्यापारी महासंघाचे ते सरचिटणीस आहेत. खंडेलवाल यांनी जीएसटी परिषदेतही काम केलेले आहे. विदेशी ई-कॉमर्स कंपन्यामुळे स्थानिक बाजारातील व्यापाऱ्यांना नुकसान होत असल्याचा मुद्दा त्यांनी मधल्या काळात उचलून धरला होता. भाजपा दिल्लीचे ते माजी खजिनदारही राहिले आहेत.

# जुगार अड्ड्यावर २७ जण सापडले

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

सातारा - काशीळ, ता. सातारा येथे एका शेतात सुरू असणाऱ्या जुगार अड्ड्यावर बोरगाव पोलिसांनी छापा टाकून २७ जणांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून रोकड, जुगाराचे साहित्य आणि मोबाइल, वाहने, असा सुमारे १७ लाख ८३ हजार ८७० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला. ही कारवाई शनिवारी रात्री आठ वाजता बोरगाव पोलिसांनी केली.

लक्ष्मण मारुती यादव, वैभव विजय साळुंखे, समीर सर्जेराव भोसले, मारुती सीताराम दरवडे, दत्ता सुदाम सोनवणे, सुरेश बाळकृष्ण रोमण, विलास नानासाहेब राजेमहाडिक, गुड्डू रावत कुमार, सदानंद नारायण देवाडिगा, रोहित रामचंद्र घाडगे, शहाबुद्दीन अकबरमिया, संदीप श्रीपती गुंजले, डालू जितू पंडित, विकास भानुदास पवार, किशोर पांडुरंग बारटक्के, जयवंत रामचंद्र जाधव, दत्तात्रय शिवाजी वायदंडे, समीर साहेब पठाण, अशोक हनुमंत मोहिते, विशाल जालिंदर नरसाळे, युवराज दिलीप माने, श्रीकांत इंद्रदेव प्रसाद, रोहित मानसिंग घाडगे, अझरुद्दीन अब्दुल शेख, मोहन बाबासो शिंदे, अशी पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या संशयितांची नावे आहेत.

# साप्ताहिक राशिभविष्य
## ( ३ ते ९ मार्च २०२४ )

मेष : शुभ कार्य घडेल

दिनांक ३ ,४ रोजी दोन दिवस नियोजित वेळेत काम पूर्ण करण्याचे ठरवले तरीसुद्धा तसे होणार नाही. त्यामुळे तुमची चिडचिड वाढू शकते. या दोन दिवसांत उशीर होणार आहे हे गृहीत धरून चाला. त्यामुळे त्रास होणार नाही. जबरदस्तीने एखादी गोष्ट करायला गेला तर ती गोष्ट अंगलट येऊ शकते. त्यापेक्षा ती न केलेली चांगली. बाकी दिवसांच्या कालावधीत चंद्रग्रहाचे भ्रमण लाभदायक राहील. म्हणजेच या दिवसांत शुभकार्य घडेल. अनपेक्षित असे प्रस्ताव आल्यामुळे आनंदाचे वातावरण निर्माण होईल. व्यवसायातून मिळणारे उत्पन्न मोठ्या प्रमाणात असेल. नोकरदार वर्गाला वरिष्ठांच्या मर्जीनेच काम करावे लागेल. आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनाल.

राजकीय क्षेत्रात हस्तक्षेप करणे टाळा. नवीन ओळखीचे नात्यात रूपांतर करू नका. संततीची काळजी घ्या.पथ्यपाणी सांभाळा.

शुभ दिनांक : ५, ९ महिलांसाठी : जबाबदारी पार पाडाल.

वृषभ : आर्थिक लाभ होईल

४ तारखेला दुपारनंतर दिनांक ५ व ९ हे संपूर्ण दोन दिवस असा हा अडीच दिवसांचा कालावधी जेमतेम राहील. यामध्ये कोणाकडून अपेक्षा ठेवू नका. या दिवसांत कारण नसताना गैरसमज निर्माण होऊ शकतात. पण हे गैरसमज होणार नाहीत याची मात्र दक्षता घ्या. राग हा क्षणिक असतो .त्यामुळे कोणतीही गोष्ट ताणून धरू नका. प्रत्येक गोष्टीच्या मुळाशी जाऊन काहीही साध्य होणार नाही. जे चालले आहे ते ठीक समजून पुढे चला. बाकी दिवसांचा कालावधी उत्तम राहील. या चांगल्या कालावधीमध्ये बरीच कामे पूर्ण होतील. व्यवसायात चाललेल्या घडामोडीत चांगले बदल होतील. आर्थिक लाभ होईल.

राजकीय क्षेत्रात वरिष्ठांशी वादविवाद होणार नाही, याची काळजी घ्या. घरगुती वातावरण चांगले राहील.आहारावर नियंत्रण ठेवा.

शुभ दिनांक : ७, ८ महिलांसाठी : महत्त्वाची कामे मार्गी लागतील.

मिथुन : जमेल तेवढेच करा

षष्ठस्थानातून अष्टमस्थानाकडे चंद्राचे प्रमाण होत आहे. त्यामुळे सध्या दिवस चांगले नाहीत असे धरून चाला. कोणत्याही नवीन गोष्टीचा शुभारंभ सध्या न केलेला चांगला. त्यासाठी थोडासा वेळ द्या. हे दिवस काही कायमस्वरूपीचे नाहीत. पण थोड्या दिवसांनी का होईना चांगले दिवस येणार आहेत. चांगल्या दिवसांची वाट पाहा. काम करताना निराशाजनक परिस्थिती निर्माण होऊ शकते. मात्र एक लक्षात ठेवा, जमेल तेवढेच करा. पण प्रयत्न सोडू नका. व्यवसायात नफा नाही मिळाला तरी चालेल, पण तोटा होणार नाही याची काळजी घ्या. नोकरदारवर्गाने वरिष्ठांच्या कामकाजात ढवळाढवळ करू नका. आर्थिकदृष्ट्या बचतीकडे लक्ष द्या. समाजमाध्यमांचा वापर जेवढ्यास तेवढा करा. कुटुंबातील मतभेद दूर ठेवा. जोडीदाराचा आदर करा. मानसिक शारीरिक ताण घेऊ नका.

शुभ दिनांक : ५, ९ महिलांसाठी : सहनशीलता वाढवा.

कर्क : घाई करू नका

सप्ताहात चंद्रग्रहाचे भ्रमण अनुकूल आहे असे म्हणता येणार नाही. सध्याच्या परिस्थितीत एक घाव दोन तुकडे करून चालणार नाही. सर्व दिवसांचा कालावधी काळजीपूर्वक हाताळावा लागेल. मी म्हणेल तीच पूर्व दिशा असे होणार नाही. इतरांनी काय करावे आणि काय करू नये याचा सल्ला देत बसू नका. त्यामुळे मनस्ताप होऊ शकतो. वादविवाद या गोष्टीपासून लांब राहा. स्वत:च्या कामाव्यतिरिक्त इतर गोष्टींत लक्ष घालू नका. त्यामुळे त्रास होणार नाही. सध्याचे दिवस बेताचे आहेत हे लक्षात ठेवा. व्यवसायात नवीन गुंतवणूक करताना घाई करू नका. नोकरदार वर्गाला कामाचा व्याप वाढता राहील. खर्च कमी करण्याचा प्रयत्न करा. समाजसेवा करण्याचा मोह सध्या बाजूला ठेवा. घरगुती वातावरण चांगले कसे राहील ते पाहा. जोडीदारांशी मतभेद होणार नाही याची काळजी घ्या. आरोग्य जपा.

शुभ दिनांक : ३, ७ महिलांसाठी : शांतपणाने निर्णय घ्या.

सिंह : वायफळ खर्च टाळा

दिनांक ७, ८ या दोन दिवसांत आळशी वृत्ती राहील. कोणतेही काम करावेसे वाटणार नाही. विनाकारण दुसऱ्यांच्या वैयक्तिक गोष्टीत हस्तक्षेप करावासा वाटेल. आपला ज्या गोष्टीशी संबंध नाही अशा गोष्टींमध्ये पुढाकार घ्याल आणि स्वत:हूनच स्वत:च्या अडचणी वाढवाल. त्यामुळे या दोन दिवसांत कोणाच्याही भानगडीत पडू नका. नियमबाह्य गोष्टी टाळा. कोर्ट-कचेरी या गोष्टींपासून लांब राहा. रागाच्या भरात केलेली कोणतीही गोष्ट नुकसानीची ठरू शकते. त्यामुळे रागावर नियंत्रण ठेवा. बाकी दिवसांचा कालावधी चांगला असेल. व्यावसायिक भरभराट होईल. नोकरदारवर्गाला वरिष्ठांचा पाठिंबा मिळेल. वायफळ खर्च टाळा. समाजसेवा करण्याचा मोह निर्माण होईल. मित्र-मैत्रिणींशी मनमोकळेपणाने बोलल्यामुळे हलके वाटेल. संततीसौख्य लाभेल. घरगुती वातावरण ठीक राहील. जोडीदाराच्या प्रकृतीची काळजी घ्या. स्वत:चे आरोग्य जपा

शुभ दिनांक : ५, ६ महिलांसाठी : नियोजनात बदल होईल.

कन्या : अपेक्षित प्रस्ताव येतील

दिनांक, ९ रोजीचा एकच दिवस सोडला तर बाकी दिवसांचा कालावधी उत्तम असेल. चांगले दिवस म्हणजे तुमच्यासाठी सुगीचे दिवस आहेत असे म्हणायला हरकत नाही. म्हणजेच या दिवसात ज्या गोष्टींना हात घालाल त्या गोष्टी पूर्णत्वाला जातील. चांगल्या कालावधीमध्ये अपेक्षित असे प्रस्ताव येतील. बऱ्याच दिवसांतून कामे मार्गी लागल्याचे समाधान होईल. व्यवसायात अनेक मार्गांतून आलेली संधी उत्पन्न वाढवणारी आहे. नोकरदारवर्गाला कामांमध्ये जो बदल स्वीकारताना त्रास होत होता तो आता होणार नाही. आर्थिक बाबतीत योग्य असे नियोजन केले तर अडचण येणार नाही. राजकीय क्षेत्रात काम करण्याचा उत्साह वाढेल. मुलांच्या वागण्या-बोलण्याकडे वेळीच लक्ष द्या. स्थावर मालमत्तेचा प्रश्न निकालात निघेल. मानसिक ताण तणाव कमी होईल. आरोग्य उत्तम राहील.

शुभ दिनांक : ७, ८ महिलांसाठी : इतरांच्या मार्गदर्शनाचा लाभ होईल.

तूळ : अनुकूलता वाढेल

शुभ ग्रहांची साथ उत्तम मिळेल. कोणताही संघर्ष न करता काम पूर्ण होईल. अनुकूलता वाढेल. वातावरण चांगले असेल. ज्या वेळी सप्ताहात असे वातावरण असते त्या वेळी कामाचे वेळापत्रक ठरवा व वेळापत्रकाप्रमाणे नियोजन करून कामकाज चालू करा. त्यामुळे कामकाजाला गती येईल. विनाकारण वाया जाणारा वेळ वाचेल. इतरांच्या मार्गदर्शनाची मदत मिळेल. सकारात्मक गोष्टी घडू लागतील. सर्व दिवस चांगले जातील. व्यवसायात आतापर्यंत जी धरसोड वृत्ती होती ती होणार नाही. नोकरदारवर्गाच्या कामातील तांत्रिक अडचणी दूर करताना जास्तीचा वेळ द्यावा लागेल. आर्थिक लाभ होईल. राजकीय क्षेत्रात स्पष्ट भूमिका सध्या तरी टाळा. नातेवाईकांच्या सुखदु:खात सहभागी व्हाल. भावंडांशी संपर्क साधाल. घरगुती वातावरण चांगले असताना होऊन गेलेल्या गोष्टींवर चर्चा करणे टाळा. आरोग्य चांगले राहील.

शुभ दिनांक : ३, ९ महिलांसाठी : दडपण दूर होईल.

वृश्चिक : योग्य मोबदला मिळेल

दिनांक ३, ४ हे दोन दिवस कितीही शांत राहण्याचे ठरवले तरी परिस्थिती अशी निर्माण होईल की, तुमचा रागाचा पारा चढेल. तुम्ही काय बोलता व काय बोलत नाही याचे भान तुम्हाला राहणार नाही. असे ज्या वेळी वातावरण असते त्या वेळी कोणत्याही प्रतिक्रिया न देणे केव्हाही चांगले. त्यामुळे त्रास होणार नाही. इतरांनी वेळेत काम करावे ही अपेक्षा तर सोडूनच द्या. असेच हे वातावरण आहे. तेव्हा स्वत:वर नियंत्रण ठेवा. बाकी दिवसांचा कालावधी चांगला असेल. व्यवसायात जुने काही व्यवहार बाकी असतील तर ते पूर्ण करताना संयम ठेवा. नोकरदारवर्गाने कामाव्यतिरिक्त इतर गोष्टींत लक्ष घातल्यास कामाचा व्याप वाढेल. खर्चाची बाजू सांभाळण्याचा प्रयत्न करा. भावंडांशी संवाद जपून करा. जोडीदाराशी असणारे मतभेद दूर होतील. प्रकृती ठीक राहील.

शुभ दिनांक : ५, ६ महिलांसाठी : घाईचे निर्णय टाळा.

धनू : स्वत:वर नियंत्रण ठेवा

दिनांक २ रोजीचा एकच दिवस अनुकूल नाही. बाकी दिवसांच्या कालावधीत चंद्र ग्रहाचे भ्रमण भाग्यस्थानातून लाभस्थानाकडे होणार आहे. बऱ्याच दिवसांपासून मनामध्ये एक प्रकारची हुरहुरी लागली होती , ती हुरहुरी आता दूर होणार आहे. त्यामुळे कोणतेही काम करताना उत्साह टिकून राहील. तुम्ही म्हणाल ती पूर्व दिशा असणार आहे. प्रत्येक गोष्टीत माझेच खरे आहे अशी विचारसरणी तुमच्या मनामध्ये नेहमीच येते ती सध्या मात्र खरी होणार आहे. व्यवसायिक दृष्ट्या भागीदारी व्यवसायासाठी येणारे प्रस्ताव चांगले असतील. नोकरदार वर्गाला कामामध्ये सुवर्णसंधी मिळेल. आर्थिक बाबतीत समाधानी राहाल. राजकीय क्षेत्रात काम करण्याची इच्छा पूर्ण होईल. मित्र-मैत्रिणींसोबत करमणूक घडेल. मुलांची साथ मिळेल. नातेवाईकांशी संपर्क साधावा लागेल. आरोग्य ठणठणीत राहील.

शुभ दिनांक : ५, ६ महिलांसाठी : घाईचे निर्णय टाळा.

मकर : शब्द जपून वापरा

४ तारखेला दुपारनंतर व दिनांक ५, ६ हे दोन संपूर्ण दिवस असा हा अडीच दिवसांचा कालावधी चांगला कसा घालवता येईल तेच पाहा. कारण या दिवसांत तुमची होणारी चलबिचल अवस्था ही चांगल्या कामाची घडी विस्कळीत करणारी आहे. या दिवसांत कोणतेही नियोजन न करता काम केल्यास नुकसान होऊ शकते. तुमचा बोलण्याचा हेतू वाईट नसला तरी तो समोरच्याला वाईट वाटण्यासारखा आहे. त्यामुळे इतरांशी बोलताना शब्द जपून वापरा. बाकी दिवसांचा कालावधी चांगला असेल. व्यवसायात उत्पन्न वाढीसाठी धीर धरावा लागेल. नोकरदारवर्गाला कामकाज सुरळीत चालण्यासाठी कष्ट वाढवावे लागतील. आर्थिक बाबतीत निष्काळजीपणा टाळा. कुटुंबात असणारे मतभेद वेळीच दूर करा. मानसिकता जपा. प्रकृतीकडे दुर्लक्ष करू नका.

शुभ दिनांक : ७, ८ महिलांसाठी : धावपळ करणे टाळा.

कुंभ : आठवणी जाग्या होतील

दिनांक ७, ८ या दोन दिवसांत कोणाशीही मतभेद होणार नाहीत याची काळजी घ्या. कारण कोणतेही असो तुमचा गैरसमज निर्माण होऊ शकतो. तेव्हा हे गैरसमजाचे वादळ टोकाचे अंतर गाठणार नाही यासाठी प्रयत्न करा. कोणत्याही गोष्टीवर भडक प्रतिक्रिया देणे म्हणजे नुकसान ओढवून घेतल्यासारखे आहे. तेव्हा शांतपणाने निर्णय घ्यायला शिका. इतरांना समजून घेण्याचा प्रयत्न करा. स्वत:चीच बाजू खरी करण्याचा अट्टहास सोडा. बाकी दिवस चांगले असतील. व्यावसायिकदृष्ट्या भांडवलात वाढ कराल. ही गोष्ट आगामी काळासाठी फायद्याची ठरेल. नोकरदारवर्गाला वरिष्ठांचा पाठिंबा मिळेल. आर्थिक लाभ होईल.

जुन्या मित्र-मैत्रिणींशी भेटीगाठी होतील. त्यामुळे जुन्या आठवणी जाग्या होतील. संततीचे कौतुक कराल. घरगुती वातावरण चांगले राहील. आरोग्य साथ देईल.

शुभ दिनांक : ६, ९ महिलांसाठी : करार यशस्वी होतील.

मीन : सप्ताह लाभदायक

भाग्यस्थानातून लाभस्थानाकडे होणारे चंद्राचे भ्रमण या सप्ताहात अतिशय लाभदायक ठरेल. प्रत्येक वेळी मनामध्ये कोणती ना कोणती तरी खंत असायची. सध्या मनामध्ये खंत वाटण्यासारखी गोष्टच होणार नाही. आनंदाच्या गोष्टी समोर आल्यामुळे समाधानाची परिस्थिती निर्माण होईल. स्वत:च्या कामकाजाची जबाबदारी इतरांवर देणे तुम्हाला आवडणार नाही. तुमचे काम तुम्ही स्वत: कराल. त्या कामात कोणताही अडथळा येणार नाही. व्यवसायात नवनवीन योजना राबवण्यासाठी जे आराखडे तयार केले आहेत ते सध्या पूर्ण होतील. नोकरदारवर्गाला नोकरीमध्ये नवीन संधी मिळेल. आर्थिक अडचणी दूर होतील. भावंडांना मदत कराल. नातेवाईकांच्या कार्यक्रमानिमित्त भेटीगाठी होतील. धार्मिक गोष्टींसाठी खर्च कराल. मानसिकता चांगली राहील. आरोग्य ठणठणीत राहील.

शुभ दिनांक : ३, ७ महिलांसाठी : गोड बातमी कळेल.




१) आटपाडी : बनपुरी येथे प्लॅस्टिक निमूर्लन अभियान मध्ये सहभागी गटविकास अधिकारी मुक्तेश्वर माडगुळकर २) विद्यार्थ्यांनी प्लॅस्टिक गोळा करून गटविकास अधिकारी त्यांच्याकडे देण्यात आले.

# आटपाडी तालुक्यात प्लॅस्टिक निमूर्लन अभियान

## ५३ गावांचा सहभाग : प्लॅस्टिक कचरा निमूर्लन जनजागृती

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

आटपाडी/प्रतिनिधी : आटपाडी तालुक्यात प्लॅस्टिक निमूर्लन अभियान राबविण्यात आले. सदरचे अभियान हे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तृप्ती धोडमिसे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आले.

या प्लॅस्टिक निमूर्लन अभियान मध्ये आटपाडी तालुक्यातील ५३ गावांनी सहभाग नोंदविला. प्रत्येक गावातील सरपंच, ग्रामसेवक, नागरिक तसेच माध्यमिक व प्राथमिक शाळेतील विद्यार्थी व शिक्षक यांनी या अभियानामध्ये मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदविला.

यावेळी विद्यार्थीनी तसेच शिक्षक व अधिकारी तसेच कमर्चारी यांनी मोठ्या प्रमाणात प्लॅस्टिक कचरा संकलन केला होता. तसेच यावेळी प्लॅस्टिक कचरा निमूर्लन बाबत गावामध्ये जनजागृती करण्यात आली. बनपुरी येथे राबविण्यात आलेल्या या अभियानामध्ये आटपाडी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी मुक्तेश्वर बनपुरीचे ग्रामसेवक धिरज मोरे, बनपुरीचे सरपंच दिपक देशमुख, उपसरपंच सुरेश काळे, जेष्ठ नेते महादेव पाटील, विजय घुटूगडे, विकास पुकळे, धनंजय कांबळे, ऋषिकेश चोथे, वैशाली कांबळे, श्री. गारळे, प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक, बाबासाहेब देशमुख हायस्कूलचे सर्व शिक्षक आदी मान्यवर उपस्थित होते.

## शक्तीपीठ मार्ग रद्द होण्यासाठी सर्वांनी संघटित ताकद उभी करणार

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

कोल्हापूर : नागपूर ते गोवा शक्तीपीठ मार्ग कुणाच्या तरी सुपीक डोक्यातून आलेली नको ती कल्पना आहे. त्यामुळे या मार्गाला काँग्रेसचा जाहीर विरोध असुन शक्तीपीठ मार्ग रद्द होण्यासाठी सर्वांनी संघटित ताकद उभी करण्याचा निर्धार येथे व्यक्त करण्यात आला. विधान परिषदेतील काँग्रेसचे गटनेते आमदार सतेज पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत अजिंक्यतारा कार्यालयात शेतकऱ्यांची बैठक झाली.

नागपूर ते गोवा शक्तीपीठ मार्ग कोल्हापूर जिल्ह्यातील अनेक गावातून जाणार आहे. या मार्गासाठी हजारो शेतकऱ्यांच्या सुपीक जमिनी संपादित केल्या जाणार आहेत .त्यामुळे या शक्तीपीठ मार्गाला विरोध दर्शवण्यासाठी विविध गावातील शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाने आमदार पाटील यांची भेट घेतली.

आमदार सतेज पाटील म्हणाले, कोणत्याही कार्याची कोल्हापुरातून झालेली सुरुवात ही राज्यभर पोहचत असते. त्यामुळें आणि नागपूर - गोवा शक्तीपीठ महामार्गाच्या विरोधाची सुरवात कोल्हापुरातून करूया. या महामार्गाची माहिती अजुनही लोकांना नाही. खरोखरचं याची लोकांना गरज आहे काय? असा सवालही त्यांनी उपस्थीत करत, जमिनी घेवून रस्ता करणे हे संयुक्त ठरणार आहे काय? याचा देखील विचार करणे गरजेचे असल्याचे आमदार पाटील यांनी सांगितले.

कोल्हापूर जिल्ह्यातील ८९ ते ९४ टक्के शेतकरी दोन एकराच्या आतील आहेत. या महामार्गाच्या विरोधासाठी अकरा मार्चला जिल्हाधिकारी कार्यालयावर सर्वपक्षीय भव्य मोर्चा काढण्याबाबतही यावेळी चर्चा करण्यात आली. गरज नसलेला हा महामार्ग असुन

कुणाच्या तरी सुपीक डोक्यातून आलेली ही नको ती कल्पना आहे. त्यामुळे काँग्रेसचा याला जाहीर विरोध राहील असेही त्यांनी जाहीर केले. जिल्हा परिषदेचे माजी सदस्य अंबरीश घाटगे यांनी शेतकऱ्यांना न्याय आणि ताकद देण्याची शक्ती केवळ सतेज पाटील यांच्याकडे आहे. त्यामुळें या लढ्याचे नेतृत्व आमदार पाटील यांनी करावे असे आवाहन त्यांनी केले.

## संजय मंडलिक हेच उमेदवार, महाडिक यांनी 'मोदींची गॅरंटी' तेवढी पाठ करावी

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

गडहिंग्लज (जि.कोल्हापूर) : महायुतीचा 'कोल्हापूर'चा उमेदवार अजून ठरलेला नाही.परंतु,नरेंद्र मोदींना पुन्हा पंतप्रधान करण्यासाठी आपण कटिबद्ध राहुया.

खासदार संजय मंडलिक हेच शिंदे गटाचे उमेदवार असे डोळ्यासमोर ठेवून काम सुरू आहे.खासदार धनंजय महाडिक यांना पंतप्रधान मोदी यांच्या कल्याणकारी योजनांची आकडेवारी तोंडपाठ आहे. त्यांनी आता 'मोदींची गॅरंटी' तेवढी पाठ करावी,असा सल्ला पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी दिला.

गडहिंग्लज शहरातील ४७ कोटींच्या नळयोजनेसह ५५ कोटींच्या विकासकामांचा प्रारंभ आणि बांधकाम कामगारांना भांडी संच वाटपप्रसंगी ते बोलत होते.अध्यक्षस्थानी खासदार संजय मंडलिक होते.खासदार धनंजय महाडिक यांची प्रमुख उपस्थिती होती.नगरपालिकेच्या प्रांगणात हा कार्यक्रम झाला.



मुश्रीफ म्हणाले, गडहिंग्लजच्या विकास कामांसाठी १०० कोटींचा निधी दिला. रिंगरोड आणि बायपास रस्त्याशिवाय शहरातील वाहतुकीची कोंडी दूर होणार नाही. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याशी माझाही चांगली ओळख आहे. त्यांच्याकडे जाताना महाडिक यांनी मलाहीसोबत न्यावे, म्हणजे संकेश्वर - आंबोली महामार्गाप्रमाणे रिंग रोडचे कामही नक्कीच मार्गी लागेल.

महाडिक म्हणाले, ७० वर्षात काँग्रेसने प्रत्येक निवडणुकीत रस्ते, वीज,पाणी देण्याची आणि गरीबी हटविण्याची केवळ आश्वासनेच दिली.परंतु, प्रत्यक्षात काहीच दिले नाही.लोकांच्या खऱ्या गरजा ओळखलेल्या मोदींनी ते अवघ्या १० वर्षात करून दाखवले.

मंडलिक म्हणाले, उपजिल्हयाचे ठिकाण म्हणून गडहिंग्लज शहराचा नियोजनबद्ध विकास करण्याची गरज आहे.निवडणूका येतील आणि जातील.परंतु, विकासाचा संकल्प पूर्ण करण्यासाठी पुन्हा आशीर्वाद द्यावा.

कार्यक्रमास प्रकाश चव्हाण, संग्राम कुपेकर, हेमंत कोलेकर,सतीश पाटील, वसंत यमगेकर, रमेश रिंगणे,नरेंद्र भद्रापूर, प्रकाश पताडे,अनुप पाटील,अमर मांगले,मंजुषा कदम,उर्मिला जोशी आदी उपस्थित होते. यावेळी किरण कदम, सिध्दार्थ बन्ने, महेश सलवादे यांचीही भाषणे झाली.गुंडया पाटील यांनी स्वागत केले.सुभाष कोरे यांनी सूत्रसंचालन केले. रश्मीराज देसाई यांनी आभार मानले.

'रिंग रोड'साठी दिल्लीतून निधी आणू

पालकमंत्री मुश्रीफ यांनी गडहिंग्लजला शंभर कोटींचा निधी दिला,त्यातील ५५ कोटींच्या कामांचा प्रारंभ हा ऐतिहासिक दिवस आहे.झपाटयाने वाढत्या शहराच्या सर्वांगीण विकासाचा मास्टर प्लॅन तयार करावा.मी आणि संजयदादा दोघेही दिल्लीला जाऊन गडकरींचा शर्ट धरुन रिंग रोड साठी निधी आणून देवू, अशी ग्वाही खासदार महाडिक यांनी दिली.

# मविआत तिढा कायम

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

अकोला : आगामी लोकसभा निवडणुकीसाठी वंचित बहुजन आघाडीची महाविकास आघाडीसोबत चर्चा कायमच आहे. एकीकडे वंचितने तीन लोकसभा मतदारसंघांसाठी उमेदवार जाहीर केले आहेत. त्यात अकोला, वर्धा, सांगलीचा समावेश आहे. त्यामुळे मागील लोकसभेप्रमाणे यंदाही वंचित ''एकला चलो रे''ची भूमिका घेण्याची दाट शक्यता आहे. तशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. कारण १५ जागा वाटपांवरून अजूनही महाविकास आघाडीमध्ये तिढा कायम आहे. पण ६ मार्चला शरद पवारांकडून भेटीचं निमंत्रण आल्याचं आंबेडकर म्हटले.

वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी आपली पत्रकार परिषद घेत आज स्पष्टच बोलले आहेत. ''आम्ही आमची ताकद असलेल्या जागांची माहिती मविआकडे दिली. मविआने १५ जागा ओबीसी आणि ३ अल्पसंख्याकांना द्यावी, असा मसूदा ठेवला होता. मविआला आम्ही आमचं म्हणणं मांडलंय. आम्ही कुठल्या जागांसाठी आग्रही होतो. सोबतच सुचना मांडल्या होत्या. पहिली सूचना ४८ पैकी १५ जागा हे ओबीसी आणि किमान ३ उमेदवार अल्पसंख्याक समाजाचे असायला पाहिजे. विशेष म्हणजे मतदाराला लक्षात आलं पाहिजे, की माझं मत सेकेल्युर राहील. हेच त्या ठिकाणी महत्वाचं आहे. मविआने तसे जाहीर केलं पाहिजे. आता मविआ काय भूमिका घेते याकडं लक्ष राहणार आहे'', असेही आंबेडकरांनी यावेळी म्हटलंय.

आता ६ तारखेपर्यंत सारं काही सुरळीत होईल, या वडेट्टीवारांच्या वक्तव्याबद्दल माहीत नसल्याचं आंबेडकर म्हटले आहे. कारण त्यांच्यातील १५ जागांवरचा तिढा सुटला तर पुढे पाहू. जर एकटं लढलो तर आमची लढत भाजपसोबत असणार आहे. परंतु अजूनही आम्ही महाविकास आघाडीत आहो, याबद्दल आम्हालाही संभ्रम आहे. असेही ते म्हटले. अजूनही महाविकास आघाडीच्या बैठकीचं पुढचं निमंत्रण नाहीये. मात्र, ६ मार्चला शरद पवारांकडून भेटीचं निमंत्रण आलं आहे. पण भेटीचं स्थळ अद्याप ठरलं नाहीये. नक्कीच ही भेट मुंबईच्या बाहेर असणार असल्याचे ते म्हटले.

गेल्या काही दिवसांपासून महाविकास आघाडीच्या नेत्यांच्या वंचितसोबत चर्चा, बैठका सुरू आहेत. पण जागावाटपाचा तिढा कायम आहे. प्रकाश आंबेडकर महाविकास आघाडीसोबत येतील असा ठाम विश्वास ठाकरेंच्या शिवसेनेचे खासदार संजय राऊत व्यक्त करत आहेत. तर दुसरीकडे महाविकास आघाडीसोबत चर्चा सुरू असताना वंचितनं तीन उमेदवार जाहीर केलेय. दरम्यान वर्ध्याच्या जिल्हा कार्यकारिणीने तिथल्या उमेदवाराची शिफारस केली अद्याप पक्षाने निर्णय घेतला नाही. चंद्रहार पाटलांच्या उमेदवारीवर ८ तारखेला अंतिम निर्णय जाहीर करणार असल्याचे आंबेडकर म्हटले.

अकोल्यातून प्रकाश आंबेडकर, तर वंचितकडून खात्रीलायक मिळालेल्या माहितीवरुन, वर्ध्यातून राजेंद्र साळुंखे आणि सांगलीतून डबल महाराष्ट्र केसरी चंद्रहार पाटील यांच्या नावांची घोषणा होणार आहे. त्यामुळे लोकसभा निवडणुकीत २०१९चा पॅटर्न रिपीट होण्याची चिन्हं आहेत. गेल्या निवडणुकीत वंचितनं स्वबळ आजमावलं. त्यावेळी त्यांची काँग्रेसशी बोलणी फिस्कटली होती. वंचितच्या ''एकला चलो रे''चा फटका दोन्ही काँग्रेसला बसला. सहा मतदारसंघात काँग्रेस, राष्ट्रवादी, स्वाभिमानीचे उमेदवार पडले. महाविकास आघाडीसोबत चर्चा सुरू असताना आंबेडकरांनी लोकसभेच्या तीन जागांसाठी उमेदवार घोषीत करणे. मविआसोबत युती करण्याची बोलणी अद्याप पूर्ण झालेली नाहीत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी वाणारसीतून लढणार असल्याचे जाहीर झाल्यानंतर, आपण पंतप्रधान मोदींविरुद्ध लढणार का? असे आंबेडकर यांना माध्यमाने प्रश्न विचारला असता त्यावर त्यांनी म्हटलं. मी अकोल्यातूनच लढणार. मोदींनी माझ्याविरोधात अकोल्यात येऊन लढावं.

अजित पवार संदर्भात आंबेडकर बोलताना म्हणाले की घोटाळा झालेला आहे, हे बरोबर आहे. त्यातले अधिकारीही पुढे आले आहेत. जर सत्ता बदल झाल्यास, कायदेशीर कारवाई करण्यासाठी, असा आग्रह आमचा पक्षाचा राहणार. अजित पवारांबद्दल चौकशी आणि कारवाई गांभीर्याने झाली पाहिजे. अधिकाऱ्यांनी आता फक्त आमची सत्ता येऊ नये एवढं बघावं.

दरम्यान, सुनेत्रा पवार आणि सुप्रिया सुळे यांच्या लढतीसंदर्भात बोलतांना म्हटले की बारामतीत शरद पवारांचा नवीन पिढीसोबतचा रॅपो कसा असेल, यावर तेथील लढतीचं चित्र अवलंबून असणार आहे.

## मोफत शिक्षण विसरा! साडेसात हजार शाळा 'आरटीई'मधून बाहेर

***सांगली : माणदेश एक्सप्रेस***

आरटीई कायद्यात सुधारणा करून शासनाने वर्षाकाठी शेकडो कोटी रुपयांच्या प्रतिपूर्तीच्या ओझ्याखालून सुटका करून घेतली आहे. राज्यातील आठ हजार खासगी शाळांपैकी सुमारे सात हजारांहून अधिक शाळा या कायद्यातून बाहेर पडणार आहेत. खासगी शाळांत पाल्याला मोफत शिकवण्याचे पालकांचे स्वप्न मात्र भंग होण्याचीही शक्यता आहे.

सरकारी शाळांमध्ये शिक्षकांच्या पगारासह अन्य बाबींसाठी हजारो कोटींचा खर्च शासन करते, तरीही आरटीई प्रवेशासाठी प्रतिविद्यार्थी दरवर्षी कमाल १७,५०० रुपये खासगी शाळांना द्यावे लागतात. वर्षाकाठी हा बोजा शेकडो कोटींवर जातो. हे लक्षात घेऊन नवा बदल करण्यात आला आहे. शासकीय व अनुदानित शाळांमध्ये चांगल्या सुविधा असूनही त्या आरटीईमध्ये नसल्याने पटसंख्या कमी होत आहे. शिक्षक अतिरिक्त




ठरत आहेत. आरटीईमधून प्रवेशित विद्यार्थ्याला खासगी शाळेच्या फक्त शैक्षणिक शुल्कामध्ये सवलत मिळते. तेथील अन्य सुविधा मिळत नाहीत. पालकांनाच पैसे मोजावे लागतात. राज्यात सरासरी १८ लाख विद्यार्थी दरवर्षी पहिलीत प्रवेश घेतात. त्यापैकी ८५ हजार विद्यार्थ्यांनाच आरटीईनुसार खासगी शाळांत मोफत प्रवेश मिळतो.

एखाद्या खासगी शाळेच्या एक किलोमीटर अंतरात शासकीय, अनुदानित किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेची शाळा नसेल, तरच या खासगी शाळेत आरटीई नियम लागू असेल. या नियमानुसार सांगली, मिरज, कुपवाड महापालिका क्षेत्रातील ९९ टक्के शाळा आरटीईतून बाहेर पडल्या आहेत. सांगली, मिरजेतील जवळपास सर्वच खासगी शाळांपासून एक किलोमीटरच्या अंतरात महापालिका किंवा जिल्हा परिषदेच्या शाळा आहेत. त्यामुळे खासगी शाळा आता आरटीईमध्ये नसतील.

सांगली जिल्ह्यात २२६ शाळा

सांगली जिल्ह्यात आरटीई कायद्यात २२६ शाळांचा समावेश आहे. २५ टक्के सक्तीच्या प्रवेशानुसार तेथे दरवर्षी १८८६ विद्यार्थ्यांना मोफत प्रवेश मिळतो. नव्या नियमानुसार किमान २०० शाळा आरटीईतून बाहेर पडणार आहेत. जिल्हाभरात अवघ्या दोनशे-तीनशे जागाच शिल्लक राहण्याची शक्यता आहे.

२४०० कोटी रुपये थकीत

राज्यातील आठ हजार शाळांना प्रतिपूर्तीपोटी शासनाकडून २४०० कोटी रुपये येणे थकीत आहेत, ते मिळावेत यासाठी खासगी शाळा पाठपुरावा करत आहेत. काही शाळांनी न्यायालयाचे दरवाजेही ठोठावले आहेत. प्रतिपूर्तीचे पैसे देताना प्रशासन अनेक त्रुटी काढत पैसे अडवत असल्याची तक्रार आहे. विद्यार्थ्यांना प्रवेश देताना त्रुटी दिसल्या नव्हत्या का? असा शाळांचा प्रश्न आहे.

सरकारी शाळांचा पट वाढणार

नव्या नियमामुळे सरकारी, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा तसेच अनुदानित शाळांची पटसंख्या वाढणार आहे. अतिरिक्त शिक्षकांची समस्याही संपुष्टात येणार आहे. खासगी शाळांमध्ये गुणवत्तेसाठी पाल्याचा प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या पालकांची मात्र निराशा होणार आहे. त्यांना सरकारी शाळेत प्रवेश घ्यावा लागेल किंवा खासगी शाळांत शुल्क भरून प्रवेश मिळवावा लागेल.

## शिराळा तालुक्यातील डोंगरदऱ्यात 'डोंगरची काळी मैना' फुलू लागली

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

शिराळा : शिराळा तालुक्यातील डोंगरदऱ्यात 'डोंगरांची काळी मैना' म्हणून सर्वदूर परिचित असलेली करवंदे, तोरणे तसेच अळू, जांभूळ, काजू, डोंबले, आंबा आदी पूर्णपणे मोठ्या प्रमाणात बहरायला सुरुवात झाली आहे. या छोट्या काटेरी हिरव्यागार काळ्याभोर मैनेच्या सुरुवातीची हिरवीगार जाळ्याच्या जाळ्या गच्च भरल्या असून त्या जणू लक्ष वेधून घेत आहेत.

-हिरव्यागार डोंगराची काळी मैना आता हिरवीगार दिसू लागली आहे. या एप्रिल व मे महिन्याच्या सुरुवातीला ही मैना पिकायला सुरुवात होते. या ही वर्षी डोंगरदरीत असलेल्या गावामध्ये ही मैना फुलायला लागली आहे. डोंगराच्या आसपास असलेल्या गावातील लोक सुटीच्या काळात आल्यानंतर न चुकता डोंगराच्या मैनेचा आस्वाद घेत असतात. दोन वर्षांपूर्वी वर्षी कोरोनामुळे लॉकडाऊनच्या काळात या रानमेव्याकडे दुर्लक्ष झाले. मात्र आता काळ्या मैनेचा आस्वाद घेत हा हंगाम पार पडेल.

घनदाट जंगलात ही मैना बहरली आहे . तसेच जैवविविधतेने नटलेल्या या डोंगर भागाला विविध प्रकारच्या संजीवनी लाभलेली आहे. या डोंगरावर प्रथम दर्शन या मैनेचे होते. सध्या डोंगराच्या कुशीत काटेरी जाळ्यात करवंदे बहरली आहे. वसंत व ग्रीष्मातील दाहकतेत पाहताच क्षणी तोंडला पाणी सुटेल इतका चविष्ट आंबट, गोड, रानमेवा जिभेवर ठेवताच तासभर त्या रानमेव्याच्या विशिष्ट चवीची आठवण उन्हाळ्यात होत राहते.

एप्रिल, मे महिन्यात मोठ्या प्रमाणात पश्चिम भागातून मोठ्या प्रमाणात महिला, पुरुष मंडळी डोंगराची मैना घ्या, करवंदे घ्या, जांभळे घ्या, डोंबले घ्या आदी ओरडत गल्लीबोळातून विक्रीसाठी येतात. शिराळा, वाळवा तालुक्यातील गावोगावी फिरून विक्री करतात.

## दुरंगी की तिरंगी लढतीवर ठरणार सांगलीचा भावी खासदार

***सांगली : माणदेश एक्सप्रेस***

गत पंचवार्षिक सांगलीलोकसभानिवडणूक तिरंगी झाली होती. त्यामुळे काँग्रेसच्या मतांमध्ये विभाजन होऊन भाजपचे संजय पाटील यांचा विजय सोपा झाला. हीच खेळी भाजपकडून पुन्हा खेळली जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे संजय पाटील विरुद्ध विशाल पाटील यांच्यात दुरंगी लढत होणार की अपक्ष उमेदवार चंद्रहार पाटील रिंगणात उतरल्यास तिरंगी होणार आहे. यावर सांगलीचा भावी खासदार ठरण्याची शक्यता आहे.

सांगली लोकसभा हा १९६२ ते २०१४ पर्यंत काँग्रेस पक्षाचा बालेकिल्ला होता. मात्र, २०१४ च्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या लाटेत काँग्रेसचे विद्यमान केंद्रीय राज्यमंत्री प्रतीक पाटील यांचा पराभव झाला. पूर्वी काँग्रेसमध्ये असलेले संजय पाटील हे ऐनवेळी भाजपमध्ये प्रवेश करून खासदार झाले. त्यानंतर २०१९ च्या निवडणुकीत तिरंगी लढत झाली. पूर्वाश्रमीचे भाजपचे असलेले गोपीचंद पडळकर यांनी ऐनवेळी वंचित बहुजन विकास आघाडीची उमेदवारी घेतली. काँग्रेसच्या मतात फूट पडल्याने त्यांना तीन लाखांहून अधिक मते मिळाली. त्यामुळे काँग्रेस आघाडीच्या पाठिंब्यावरील स्वाभिमानी पक्षाचे उमेदवार विशाल पाटील यांचा पराभव होऊन संजय पाटील हे दुसऱ्यांदा भाजपचे खासदार झाले.

आगामी लोकसभा निवडणुकीत हॅट्रीक करण्याचे मनसुबे आखलेल्या खासदार पाटील यांनी मतदारसंघातील गावागावात आपला गट तयार केला आहे. परंतु, पक्षांतर्गत रोष रोखण्यात त्यांना अद्याप यश आलेले नाही. त्यामुळे पक्षाचे विद्यमान आमदार व पदाधिकारी उघडपणे नाराजी व्यक्त करीत आहेत. तसेच, पक्षश्रेष्ठींकडे उमेदवार बदलाची मागणी होत असलतरी खासदार पाटील यांना पर्याय देणारा तगडा उमेदवार भाजपकडे सध्यातरी नाही.

## बालविवाह रोखण्यासाठी विवाहकार्यात सहभागी होणाऱ्यांवरही कारवाई करा- रुपाली चाकणकर

**कोल्हापूर:माणदेश एक्सप्रेस**

बालविवाह रोखण्यासाठी विवाहकार्यात सहभागी असणाऱ्या सर्वांवर कारवाई करा. लग्नपत्रिका छापणारे प्रिंटिंग प्रेस मालक, विवाह होणारे मंगल कार्यालय व समाज मंदिरांबरोबरच त्या गावचे सरपंच व ग्रामसेवकांवरही कारवाई करा, अशा सूचना देवून हे निर्देश तात्काळ सर्वांपर्यंत पोहोचवा, अशा सूचना राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी शुक्रवारी दिल्या.

राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयातील शाहूजी सभागृहात बैठक झाली, यावेळी पोलीस अधीक्षक महेंद्र पंडित, अपर जिल्हाधिकारी संजय शिंदे, निवासी उपजिल्हाधिकारी संजय तेली, महानगरपालिका उपायुक्त साधना पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बाल विकास) शिल्पा पाटील, जिल्हा महिला बालविकास अधिकारी एस.एस. वाईंगडे तसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

चाकणकर म्हणाल्या, जिल्ह्यात अद्याप महिला तक्रार निवारण समित्या स्थापन न झालेल्या आस्थापनांनी तात्काळ समित्या स्थापन करुन तसा अहवाल सादर करावा. सर्व शाळा, महाविद्यालये, शासकीय व खाजगी कार्यालयांमध्ये स्वच्छतागृहे स्वच्छ असल्याची खात्री करा. बेपत्ता महिला होण्याची प्रकरणे गंभीर असून यासाठी प्रभावी उपाययोजना करणे आवश्यक आहे. महिलांची छेडछाड, युवकांमधील व्यसनाधीनता व युवकांशी संबंधित गुन्हे रोखण्यासाठी समुपदेशनावर भर द्या. सोशल मीडियाच्या वापरामुळेही युवकांमधील गुन्हेगारीचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे पालकांनी मुलांशी संवाद वाढवणे गरजेचे आहे, असे त्यांनी सांगितले.

बालविवाह, बेपत्ता महिला, मुलींमधील व्यसनाधीनता, कौटुंबिक हिंसाचार, छेडछाडीच्या घटनांचे प्रमाण कमी होण्यासाठी शासन स्तरावर प्रयत्न केले आहेत. पण महिलांवरील गुन्हे रोखण्यासाठी नागरिकांनीही सामाजिक बांधिलकी म्हणून एकजुटीने पुढे यावे, असे आवाहन करुन महिलांवरील अत्याचाराच्या घटनांचे प्रमाण कमी करुन महिला दिन हा खऱ्या अर्थाने वर्षभर साजरा व्हावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. कौटुंबिक हिंसाचाराच्या घटना टाळण्यासाठी भरोसा सेल महत्वपूर्ण कामगिरी करत असून कौटुंबिक समस्या असणाऱ्या महिलांनी भरोसा सेलशी तर संकटात अडकलेल्या महिलांनी निर्भया पथकाशी संपर्क साधावा, असे आवाहन करुन जिल्ह्यातील निर्भया पथकाच्या कामाचे त्यांनी कौतुक केले.नोकरी करणाऱ्या महिलांसाठीची वसतिगृहे, वन स्टॉप सेंटरची सद्यस्थिती, जिल्ह्यात स्थापन करण्यात आलेल्या तक्रार निवारण समित्या, महिलांवरील अत्याचाराचे गुन्हे, बेपत्ता महिला व सापडलेल्या महिला, महिलांवरील हल्ले व हिंसाचाराच्या घटना, हरवलेली व सापडलेली बालके, भरोसा सेल, निर्भया पथक, गर्भलिंग निदान व गर्भपात रोखण्यासाठी उपाययोजना व करण्यात आलेली



कारवाई या विषयींचा सविस्तर आढावा चाकणकर यांनी घेतला.जिल्हा पोलीस अधीक्षक महेंद्र पंडित यांच्यासह संबंधित विभागांनी संबंधित विभागांची माहिती सादरीकरणाद्वारे दिली.

निर्भया पथकाचे मोबाईल क्रमांक-

कोल्हापूर शहर विभाग - ९४०५३८०१३३, जयसिंगपूर विभाग ९४०५०१६१३३, गडहिंग्लज विभाग - ९४०४९१२१३३, करवीर विभाग - ९४०५३८०१३३, इचलकरंजी विभाग,- ९४०५३०१३३, शाहूवाडी विभाग - ९०६७९६९३९३ असे असून संकटात सापडलेल्या महिला, मुलींनी या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन पोलीस अधीक्षक महेंद्र पंडित यांनी केले.